cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-६९ | बुधवार दि.१९ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## केंद्राचे धोरण अन् महागाईचा भडका !

आधीच महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांना आणखी एक मोठा झटका बसला आहे. निवडणुका संपताच देशातील घाऊक महागाईचा दर वाढत चालला आहे. देशाच्या अनेक भागात तीव्र उष्णतेची लाट कायम राहिल्याने जूनमध्येही भाज्या, फळांच्या किमती वाढत राहिल्या. आणखी काही दिवस महागाईचा जोर कायम राहील असे दिसते. मान्सूनच्या प्रगतीवर अन्नधान्य महागाईचा मार्ग निश्चित होईल.

## सिक्कीममध्ये मुसळधार, भूस्खलनात १ ठार

नवी दिल्लीः सिक्कीममध्ये मुसळधार पावसाने कहर केला आहे. मंगन आणि उत्तर सिक्कीममधील विविध ठिकाणी प्रचंड आणि विनाशकारी भूस्खलन झाले आहे. यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून, पाच जण बेपत्ता झाले आहेत. सिक्कीममधील मुसळधार पावसामुळे कालिम्पाँग जिल्ह्यातील तीस्ता बाजारजवळ स्ता नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे बाजूला असलेली अनेक घरे पाण्याखाली गेली आहेत. भूस्खलनामुळे सिक्कीममधील अप्पर ग्याथांग आणि तरग गावात मोठ्या प्रमाणा घरे उद्ध्वस्त झाली आहेत. मंगणमधील जिल्हा मुख्यालयाला जोडणारा महत्त्वाचा रस्ताही भूस्खलनानंतर बंद करण्यात आला होता, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# यंदाही १ रुपयातच होणार पीकविमा

## कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती, अंतीम मुदत १५ जुलै पर्यंत

**मुंबई । प्रतिनिधी**

**प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत महाराष्ट्रात खरीप हंगाम २०२४ साठी पीक विमा भरण्याची सुरुवात आजपासून शासनाच्या पोर्टलद्वारे करण्यात आली असून, याही वर्षी शेतकऱ्यांना आपल्या अधिसूचित पिकांचा विमा भरण्यासाठी केवळ १ रुपया भरावा लागणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी (दि.१८) दिली आहे.**



प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून मागील वर्षी विक्रमी १ कोटी ७० लक्ष पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आपला पीकविमा भरून या योजनेत सहभाग घेतला होता. खरीप २०२४ साठी भात, ज्वारी, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, भुईमूग, तीळ, कारळे, कांदा ही १४ पिके विमा योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत. तर या पिकांचा विमा भरण्याची अंतिम मुदत १५ जुलै असून, त्यापूर्वी शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा भरून घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या १४ पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना याम भाग घेता येईल. अधिसूचित पान २ वर

### *विमा योजनेत सहभागी होण्यासाठी हे करा*

*अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांस देखील या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. मात्र त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान ७ दिवस संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे. इतर बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड व पिक पेरणीचे स्वयं घोषणापत्र घेवून प्राधिकृत बँकेत किंवा कॉमन सर्विस सेंटरच्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा शासनाच्या https://www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता. योजनेत सहभागासाठी अंतीम मुदत दि. १५ जुलै २०२४ आहे.*

# शेतकरी सन्मान योजनेचा १७ वा हप्ता जारी

## ९ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना लाभ




**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**शेतकरी सन्मान योजनेचा १७ वा हप्ता मंगळवारी (दि. १८) जारी करण्यात आला आहे. वाराणशी येथे आयोजित एका कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या हप्त्यासोबतच कृषी सखी महिलांच्या प्रमाणपत्रांचेही वाटप करण्यात आले.**

नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची पान २ वर

## मान्सून पुढील चार दिवस सुटीवर

पुणे : बुधवार दि. १२ जून रोजी मान्सूनने विदर्भातील अमरावती, चंद्रपूरच्या भागापर्यंत मजल मारली होती, परंतु, त्यानंतर मात्र मान्सून तिथेच थबकला आहे. तिथून पुढे त्यामध्ये काहीच प्रगती झालेली नाही. मंगळवार दि. १८ जून रोजी ७ दिवस झाले तरी मान्सूनची हालचाल झालेली नाही, त्यामुळे शेतकरी राजा चिंतेमध्ये आहे. पुढील तीन-चार दिवसांमध्ये मान्सून सक्रिय होईल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. यंदा नैऋत्य मोसमी वाऱ्यांची वाटचाल सुरवातीला चांगली वेगाने झाली. केरळमध्ये ३० मे रोजी दाखल झाला आणि त्यानंतर महाराष्ट्रातही वेळेअगोदर हजेरी लावली. परंतु, विदर्भात मात्र चांगलाच रेंगाळलेला आहे. दरम्यान, राज्यामध्ये काही भागात ढगाळ हवामानासह वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. पान २ वर

# पंकजा मुंडे यांच्यावर आठवडाभरात महत्वाची जबाबदारी

## राजकीय पुनर्वसन करुन भाजप बांधणार ओबीसींची मोट

**बीड । विशेष प्रतिनिधी**

**गेल्या साडेचार वर्षापासून ओबीसी नेत्या पंकजा मुंडे यांनी एक प्रकारे राजकीय वनवास भोगला. पक्षाकडून त्यांच्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याने मुंडे समर्थकांमध्ये असंतोष होता. त्यातच बीड लोकसेभेत त्यांचा निसटता पराभव ओबीसींच्या जिव्हारी लागला. त्यातून चार आत्महत्या झाल्या. लोकसभेत भाजपला राज्यात बसलेला फटका आणि मराठा समाज दुरावल्याने ओबीसींची मोट बांधण्यासाठी पंकजा मुंडे यांच्यावर आठवडाभरात राज्य भाजपची महत्वाची जबाबदारी दिली जाणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. तसे झाले तर विधानसभा निवडणुकीत भाजपला त्याचा मोठा फायदा होऊ शकतो.**

भाजप आणि ओबीसी हे सुत्र स्व. गोपीनाथ मुंडे यांच्यामुळे तयार झालेले आहे. कोणत्याही निवडणुकीत भाजपच्या पाठीशी ओबीसी समाज राहीलेला असून त्यावरच आतापर्यंत राज्यात भाजपने प्रत्येक निवडणूकीत यश मिळवलेले आहे. मुंडे साहेब असताना ओबीसी नेत्यांचे भाजपमध्ये महत्वाचे स्थान असायचे. मात्र गेल्या साडेचार वर्षात पंकजा मुंडे यांचा परळीतून पराभव झाल्यावर पंकजा यांच्यासह राज्यातील ओबीसी नेत्यांकडे दुर्लक्ष केले गेले. पान २ वर

### *दिल्लीत खलबत्ते*

*विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दिल्लीत राज्य आणि केंद्रीय नेत्यांमध्ये मंगळवारी खलबत्ते सुरू झाले आहेत. राज्यातील सात महत्वाचे नेते दिल्लीला गेले होते. यावेळी गृहमंत्री अमित शहा, मंत्री पियुष गोयल, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासोबत विधानसभा निवडणुक, सध्याची राज्यातील परिस्थिती, लोकसभा निवडणुकीतील अपयश, राज्यातील पक्ष नेतृत्वात बदल आणि महायुतीच्या पक्षांमधील समन्वय यावर चर्चा झाल्याची माहिती आहे.*

### *पाच नेते एकाच विमानातून दिल्लीला गेले*


*भाजपची दिल्लीत बैठक असल्याने राज्यातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंकजा मुंडे, रावसाहेब दानवे, चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार हे पाच नेते मुंबईहून मंगळवारी एकाच विमानातून दिल्लीला गेले. तर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावन्नकुळे हे नागरपूर आणि आशिष शेलार हे मुंबईतूनच पण वेगळ्या विमानाने दिल्लीला पोहचले. पाच नेत्यांसोबत पंकजा मुंडे या सुध्दा एकाच विमानाने दिल्लीला गेल्याने भाजप आता त्यांच्याकडे विशेष लक्ष देणार असल्याचे दिसते.*

### *महाराष्ट्रात पक्षांतर्गत फेरबदल*

*लोकसभा निवडणुकीत भाजपला अपयशाचा सामना करावा लागला. मराठा, मुस्लिम आणि मागासवर्गीय समाजाची मते भाजपला मिळाली नसल्याने २३ वरुन केवळ ९ जागांवर यावे लागले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला राज्यात कडाडून विरोध होत असल्याने भाजप महाराष्ट्रात पक्षांतर्गत फेरबदल करणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. त्यानुसार लोकसभा निवडणुकीत पराभव झालेल्या पंकजा मुंडे आणि रावसाहेब दानवे यांच्यापैकी एकाची प्रदेशाध्यक्ष पदी वर्णी लागू शकते. मराठा समाज नाराज असल्याने दानवे यांना प्रदेशाध्यक्ष केले तरी त्याचा भाजपला विधानसभा निवडणुकीत फायदा होईल याची शाश्वती नाही, त्यामुळे पंकजा मुंडे यांची लॉटरी लागण्याची दाट शक्यता आहे.*



## भाजपशासित राज्ये बनली पेपरफुटीची केंद्रे-राहुल गांधी



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**वैद्यकीय प्रवेशासाठी महत्वाची असणाऱ्या नीट परीक्षेतील गोंधळावरुन काँग्रेस सातत्याने केंद्र सरकारवर टीका करत आहे. आता याच मुद्यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. राहुल गांधी म्हणाले, भाजप शासित राज्ये पेपर लीकचे केंद्र बनले आहेत, पण पंतप्रधान मोदी या मुद्द्यावर मौन बाळगून आहेत.**

राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट केले की नीट परीक्षेतील २४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ सुरू आहे आणि नरेंद्र मोदी नेहमीप्रमाणेच या मुद्यावर मौन पाळत आहेत. बिहार, गुजरात आणि हरियाणामधील अटकेवरुन स्पष्टपणे दिसून येते की, परीक्षेत पद्धतशीरपणे संघटित भ्रष्टाचार होत आहे आणि यासाठी भाजप शासित राज्ये पेपरफुटीची केंद्रे बनली आहेत. राहुल पुढे म्हणाले, आम्ही आमच्या प्रतिज्ञापत्रात पेपरफुटीच्या विरोधात कठोर कायदा पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१८ जून २०२४**

आवक क्किंटलमध्ये तर भाव प्रतिक्किंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :१.५० क्किंटल | २,२५० | २,३०० | २,२७५ |
| ज्वारी/हायब्रिड :४४.०० क्किंटल | १,९०० | ३,१८० | २,३०३ |
| मूग : ०.५० क्किंटल | ७,२३० | ७,२३० | ७,२३० |
| तूर : ११.०० क्किंटल | ८,५०० | ११,५०० | १०,२७८ |
| उडीद : ९.५० क्किंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: २५.५० क्किंटल | २,००० | २,७०१ | २,५२५ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्किंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ५४.०० क्किंटल | ४,३०० | ४,४६० | ४,४२२ |
| हरभरा: १.५० क्किंटल | ६,२९० | ६,३७१ | ६,३३० |

## ओबीसी बांधवांनी अडवला धुळे-सोलापुर महामार्ग

# आमच्या अन्नात माती कालवणारा तू आणि आम्हाला भाऊ म्हणतो

## लक्ष्मण हाके यांची मनोज जरांगेंवर जळजळीत टीका





**वडीगोद्री । पतिनिधी**

माझ्या सर्व ओबीसी बांधवांना विनंती कायदा हातात घेऊ नका, करियर घडवणारी आपली ही नवीन जनरेशन आहे, असे सांगून उपोषणकर्ते प्रा. लक्ष्मण हाके म्हणाले, आंदोलनाची तुलना हे आंदोलन करू पाहत आहेत तिकडे रेड कार्पेट घातले जाते आणि आमच्याकडे दुर्लक्ष केलं जातं ही आमच्या कार्यकर्त्यांची भावना आहे. आमच्या अन्नात माती कालवणारा तु आणि आम्हाला भाऊ म्हणतो, अशी हाके पान २ वर

### हाकेंच्या उपोषणाचे बीड जिल्ह्यापर्यंत लोण

लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी हातोला या गावाने उपोषण सुरु केले आहे. यावेळी २५ गावचे सरपंचही उपोषणात सहभागी झाले आहेत. त्याबरोबरच बीड जिल्ह्यातून दररोज मोठ्या संख्येने उपोषणस्थळी ओबीसी समाज बांधव जात आहेत.

## विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलैला मतदान

### प्रत्येक उमेदवारासाठी २३ मतांचा कोटा

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीपाठापाठ महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि महायुतीकडून आगामी विधानसभा निवडणूकांची तयारी सुरु केल्यानंतर राज्यसभेच्या एका जागेसाठी आणि विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातील चार जागांसाठी निवडणूक जाहिर झाली. आता त्यातच विधान परिषदेवरील ११ विद्यमान सदस्य अर्थात आमदार २७ जून २०२४ रोजी निवृत्त होत आहेत. त्यामुळे या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान घेण्यात येणार असल्याचे निवडणूक प्रक्रियेची माहिती



केंद्रीय निवडणूक आयोगाने जारी केली.

विधान परिषदेतील एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेच्या आमदार डॉ.मनिषा कायंदे, भाजपाचे रमेश पाटील, निलय मधुकर नाईक, विजय गिरकर, रामराव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बाबाजानी दुर्राणी, राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव पान २ वर

# डिसेंबरपर्यंत अहिल्यानगर ते बीड रेल्वे ट्रायल रन पुर्ण होणार

## खा.सोनवणेंचा मॅरेथॉन बैठकांचा धडाका : प्रशासनावर बसवली पकड



**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीत विजय मिळाल्यानंतर सत्काराचे हार-तुरे घेत न बसता खा.बजरंग सोनवणे ताकतीने कामाला लागले आहे. दि.१८ जून रोजी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागांच्या मॅरेथॉन बैठका घेतल्या. यावेळी जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा विषय असलेल्या रेल्वेबाबतीत आढावा घेतला. डिसेंबर अखेर अहिल्यानगर ते बीड रेल्वे ट्रायल रन पुर्ण होत असल्याची माहिती दिली. तर एक वर्षात परळीपर्यंत रेल्वेचे काम पुर्ण करा, अशा सुचनाही अधिकाऱ्यांना दिल्या. मॅरेथॉन बैठकातून त्यांनी जिल्हा प्रशासनावर आपली चांगलीच पकड बसविली आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी दि.१८ जून रोजी विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी मॅरेथॉन बैठकां घेतल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या हॉलमध्ये झालेल्या बैठकीला आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, लीड बँकेचे सर्व अधिकारी, विविध बँकांचे प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. जिल्हा परिषद प्रशासनाकडे असलेल्या जलजीवन मिशन योजनेला मरगळ पान २ वर

### खा.सोनवणे म्हणाले, चर्चा नको, काम दाखवा..

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या बैठकीत रस्त्याचे कामे संथगतीने सुरू आहेत. बैठकीत पालखी मार्ग असलेल्या पैठण-पंढरपूर मार्गाच्या विषयाला खा.सोनवणे यांनी हात घातला. या मार्गातील पाटोदा तालुक्यातील मळेकरवाडी घाटाचे काम अनेक वर्षापासुन रखडले होते. सदरील काम तातडीने सुरू करा, असे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. यानंतर एक तासात सदरील काम सुरू करण्यात आले. यावेळी कार्यकारी अभियंता अशोक इंगळे, सुर्यकांत गलांडे, सुनिता वनवे, प्रविण सुमंत, यांची उपस्थिती होती.

### प्रितमताईच्या कामाची खा.सोनवणेंनीच दिली पावती



खा. बजरंग सोनवणे यांनी अहिल्यानगर (नगर) ते बीडपर्यंतचा रेल्वेचा ट्रायल हा डिसेंबरअखेर होणार असल्याचे सांगितले. खासदार होऊन सोनवणे यांना महिना सुध्दा झाला नाही. शिवाय निवडणुक प्रचारात तत्कालीन खासदार प्रितमताई मुंडे यांनी रेल्वेसाठी काहीच केले नाही असे सोनवणे सांगत होते. मात्र खासदार झाल्यावर अवघ्या काही दिवसात रेल्वे संदर्भात बैठक घेऊन बीडपर्यंत डिसेंबरअखेर रेल्वेची ट्रायल होणार असल्याची माहिती दिली. म्हणजे तत्कालीन प्रितमताई मुंडे यांच्या पाठपुराव्यामुळेच हे काम झाले असल्याची एक प्रकारे खा. सोनवणे यांनीच कबुली दिली आहे.

cmyk

## अग्रलेख

# केंद्राचे धोरण अन् महागाईचा भडका !

आधीच महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांना आणखी एक मोठा झटका बसला आहे. निवडणुका संपताच देशातील घाऊक महागाईचा दर वाढत चालला आहे. देशाच्या अनेक भागात तीव्र उष्णतेची लाट कायम राहिल्याने जूनमध्येही भाज्या, फळांच्या किमती वाढत राहिल्या. आणखी काही दिवस महागाईचा जोर कायम राहील असे दिसते. मान्सूनच्या प्रगतीवर अन्नधान्य महागाईचा मार्ग निश्चित होईल. सध्या डाळींचे भाव आकाशाला भिडले आहेत. चांगला पाऊस होण्याची अपेक्षा असल्याने जुलै महिन्यापासून तूर, हरभरा आणि उडीद डाळींच्या किमती कमी होतील, असा अंदाज आहे. जुलै महिन्यापासून या तीन डाळींची आयातही वाढेल त्यामुळे देशांतर्गत पुरवठा वाढण्यास मदत होईल.

या तिन्ही डाळींचे भाव गत महिन्यापासून स्थिर असले तरी उच्च पातळीवर आहेत. मूग आणि मसूर डाळींच्या किमती स्थिर आहेत. जुलै महिन्यात तूर, उडीद आणि चणा डाळींचे भाव कमी होतील अशी आशा आहे. कारण मान्सून चांगला बरसेल अशी अपेक्षा आहे. तसे झाल्यास कडधान्याखालील क्षेत्रात लक्षणीय सुधारणा होऊ शकते. या डाळींचे चढे भाव लक्षात घेऊन शेतकरी अधिकाधिक क्षेत्रावर या धान्याची पेरणी करतील. शेतकऱ्यांना चांगले बियाणे उपलब्ध करून देणे, देशांतर्गत उपलब्धता वाढवण्यासाठी आणि किरकोळ किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकार आवश्यक त्या उपाययोजना करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. सरकारच्या धरसोड धोरणाचा परिणाम कांद्याच्या किमतीवर झाला. सरकारने आता बफर स्टॉकसाठी कांद्याची खरेदी सुरू केली असून ३५ हजार टन कांदा आधीच खरेदी केला आहे. मध्यंतरी कांदा निर्यातीसंबंधी सरकारने जे धोरण अंमलात आणले त्याचा परिणाम कांद्याच्या किमतीवर झाला आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांनी आपला राग मतपेटीद्वारे दाखवून दिला. सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली नसती तर शेतकऱ्यांना किमान ३० रुपये किलोचा भाव मिळाला असता. निर्यातबंदीमुळे शेतकऱ्यांचा संपूर्ण खरीप हंगामच उद्ध्वस्त झाला. महाराष्ट्रात केवळ कांदा पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनाच अडचणी आल्या असे नाही तर कापूस आणि सोयाबीन पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनाही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. राज्यातील अनेक बाजारपेठांत सोयाबीनला एमएसपीपेक्षा खूपच कमी भाव मिळाला. उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला. सोयाबीनच्या उत्पादनात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे; परंतु उत्पादन खर्चही निघत नाही त्यामुळे तेलबिया पिके घेणारे शेतकरी चिंतेत आहेत. २०२१ मध्ये सोयाबीनला ११ हजार रुपये प्रती क्विंटल भाव मिळाला होता मात्र, यंदा ४५०० रुपये भाव मिळणेही दुरापास्त झाले. सध्या सोयाबीनची जागा तूर डाळीने घेतली आहे. केंद्र सरकारच्या धोरण लकव्याचा सर्वाधिक फटका कांद्याचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना बसला. लोकसभा निवडणुकीत कांदा पिकाने सत्ताधाऱ्यांना जोरदार झटका दिला तरीही केंद्र सरकारकडून कांद्याचा खेळखंडोबा सुरूच आहे. यंदा मोसमी पाऊस सरासरीपेक्षा जास्त पडेल, असा अंदाज असल्याने कृषी उत्पादनात वाढ होऊन खाद्यपदार्थांची महागाई कमी होईल. सर्वसामान्यांना महागाईची झळ सोसावी लागणार नाही, असे केंद्रीय अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अहवालात म्हटले आहे. सर्वसामान्यांनाही तेच हवे आहे; परंतु केंद्र सरकारला धोरण झटके येतात त्याचे काय? त्यावर नियंत्रण ठेवावे लागणार आहे.

## लोकशाही दिनात एक तक्रार अर्ज दाखल

बीड । प्रतिनिधी

**शासन आदेशान्वये महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो.**

प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. दि. १८ जून २०२४ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या महिला लोकशाही दिनात १ तक्रार अर्ज दाखल झाला असून एक तक्रार अर्ज निकाली निघाला असल्याचे महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

# भक्ताच्या भक्तीने देव ऋणी होतो

## शिवाजी महाराज नारायणगडकर यांचे प्रतिपादन

बीड । प्रतिनिधी

भक्ताच्या भक्तीने देव ऋणी कसा होतो. जन्मोजन्मी भगवंतास जिवलग, सखा बनवण्यासाठी संतसंघ कसा अवघड आहे. साधूची सेवा केल्याने सदभक्तास भगवंताची पितांबर रुपी छाया कशी लाभते. वाल्यास पश्चाताप का झाला. असे संत साहित्याचे विविध दाखले देऊन विषदित केले. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महानसंत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या चोविसाव्या ( द्वित्तपपूर्ती ) पुण्यतिथी उत्सवात चतुर्थ दिवसाचे कीर्तन पुष्प गुंफताना महाराज बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर, श्री ह भ प नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, मृदंग महामेरू राम महाराज काजळे,श्री ह भ प नाना महाराज कदम, ह भ प सिद्धेश्वर महाराज बागलाने, नानासाहेब काकडे पाटील, सरपंच विनोद कवडे यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.



श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २४ व्या ( द्वितपपूर्ती ) पुण्यतिथी सोहळ्यात चतुर्थ दिवसाचे कीर्तन पुष्प गुंपताना महंत प्रेम मूर्ती ह भ प शिवाजी महाराज नारायण गडकर यांनी संत नामदेवराय यांच्या संतापायीं माथां धरितां सद्भावें । तेणें भेटे देव आपेंआप ।।१।।

म्हणवूनि संतां अखंड भजावें । तेणें भेटे देव आपेंआप ।।२।।

साधुपाशीं देव कामधंदा करी । पीतांबर धरी वरी छाया ।।३।।

नामा म्हणे देव इच्छी संतसंग । आम्हां जिवलग जन्मोजन्मीं ।।४।।

यां अभंगावर सुंदर चिंतन मांडले. दादा माऊलींचे जीवन हे परमार्थिक साधकांसाठी आदर्श होते. किर्तन भजनातून ज्ञानदान आणि अन्नदानाच्या माध्यमातून लोकांना तृप्त केलें. दादा माऊलींचे नामस्मरणावरती खूप मोठे प्रेम होते.यावे कीर्तनासाठी साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंगाचार्य राम महाराज काजळे, श्री ह भ प, श्री ह भ प हरीकिसन देवकर श्री ह भ प संजय देवकर श्री ह भ प ज्ञानेश्वर माऊली आवटे ,श्री ह भ प बिभीषण महाराज कोकटे, अभिमान महाराज ढाकणे यांच्यासह माऊली फडावरील सर्व महाराष्ट्रातील नामांकित गायक वादक मंडळींची उपस्थिती होती.

## परळी वै. येथे समुपदेशन मेळाव्याचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

**कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था परळी वैजनाथ यांनी दिनांक २१ जून २०२४ रोजी सकाळी ११ वाजता तिरुपती मंगल कार्यालय शिवाजीनगर परळी वैजनाथ येथे समुपदेशन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १० वी १२वी नंतर भविष्यातील रोजगारांच्या संगीत व्यक्तिमत्व विकास बायोडाटा तयार करणे, मुलाखतीची तयारी नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण व रोजगारांच्या संधी, व्यवसायासाठी लागणाऱ्या लोन कर्जाबाबतची माहिती, करिअर प्रदर्शनी इत्यादी बाबत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ प्रोफेसर, टीचर, एनजीओ, यशस्वी उद्योजक यांच्यामार्फत मार्गदर्शन समुपदेशन करण्यात येणार आहे. तरी सर्व लाभार्थींनी वरील ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य परळी वैजनाथ यांनी केले आहे.

# जळगाव येथे २६ जूनपासून पहिले शिवचरित्र साहित्य संमेलन

नागपूर । प्रतिनिधी

**यंदाचे २०२४ हे वर्ष छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे सार्थ त्रिशती वर्ष असून त्यानिमित्ताने २६ ते २९ जून दरम्यान जळगाव येथे विश्वातील पहिले शिवचरित्र साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. अध्यक्षपद धर्मभास्कर सद्गुरूदास महाराज नावाने परिचित असलेले 'शककर्ते शिवराय' या ग्रंथाचे लेखक विजयराव देशमुख भूषविणार आहेत.**

चार दशकांपासून शिवचरित्राचे गाढे अभ्यासक व वक्ते असलेले शिवकथाकार विजयराव देशमुख यांनी शिवचरित्राशी निगडीत असलेल्या शेकडो साधनांचे मूलग्राही अध्ययन केले असून त्यांनी 'शककर्ते शिवराय' हा द्विखंडात्मक शिवचरित्र लिहिलेले आहे. शिवचरित्र सकारात्मक रितीने पुढील पिढीस हस्तांतरित करावे, या उद्देशाने इतिहास प्रबोधन संस्था आणि नूतन मराठा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव येथील नूतन मराठा महाविद्यालयाच्या प्रांगणात हे संमेलन होत आहे. या साहित्य संमेलनाचे उद्घाटन सातारा गादीचे छत्रपती श्रीमंत शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते होणार असून, कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज, तंजावरच्या गादीचे वारस श्रीमंत शिवाजी राजे भोसले आणि नागपूर गादीचे वारस श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संमेलनाचे निमंत्रक प्राचार्य लक्ष्मणराव देशमुख, निमंत्रक रवींद्र पाटील (पाचोरा), इतिहास प्रबोधन संस्थेच्या सचिव भारती साठे (यावल) यांनी केले आहे

### सरदार घराण्यांच्या वारसदारांचीही उपस्थिती

शिवकाळातील छत्रपती शिवरायांच्या सोबत असणारे ७५ सरदार घराण्यांचे वारसदार तसेच, शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थति राहणार आहेत. यानिमित्ताने नाणे संग्रह, शस्त्रप्रदर्शन, पगडी प्रदर्शन, चित्र प्रदर्शन, वीरगळ व आरमार प्रदर्शनासोबत गोंधळ, जागरण, पोवाडा, शिवकालीन कलांचे सादरीकरण, संत साहित्य, शिवछत्रपतींचा राज्याभिषेक आदी विषयांवर परिसंवाद, मुलाखती, अभ्याससत्र असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत.

# उपोषणकर्ते लक्ष्मण हाकेंना ईसीजी लावला

## तब्येत बिघडल्याने कार्यकर्ते भावुक; पाणी पिण्याचा आग्रह



जालना । प्रतिनिधी

**राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण चांगलेच तापले आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाची दखल घेत राज्य सरकारने मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी १ महिन्यांचा अवधी मागितला. त्यानंतर, मनोज जरांगे यांनी आपले उपोषण मागे घेतले. मात्र, दुसरीकडे ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची गॅरंटी द्या, अशी मागणी करत लक्ष्मण हाके वडीगोद्री गावात उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा वाढत असून, त्यांनी पाणीही घेणे बंद केले आहे. त्यामुळे, उपोषणकर्ते लक्ष्मण हाके यांची प्रकृती बिघडली असून मंगळवारी डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली. रक्तदाब वाढत असल्याने हाके यांना ईसीजी लावण्यात आला असून, कार्यकर्त्याकडून लक्ष्मण हाके यांना पाणी पिण्यासाठी मोठा आग्रह केला जात आहे. यावेळी भावुक होऊन ओबीसी कार्यकर्त्यांकडून घोषणाबाजीही केली जात आहे.**

ओबीसी समजाच्या न्याय व हक्कासाठी आपले उपोषण आहे, असे म्हणत लक्ष्मण हाके यांनी ५ दिवसांपासून उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यातच, गेल्या २ दिवसांपासून पाणी पिणेही बंद केले आहे. त्यामुळे, त्यांची प्रकृती बिघडत चालली असून अशक्तपणाही आला आहे. लक्ष्मण हाके यांच्या शरीरातील शुगर आणि पाणीपातळी खालावली, चक्कर येत असल्याने डॉक्टरांच्या पथकाकडून त्यांना उपचाराचा आग्रह करण्यात आला. मात्र, हाके यांच्याकडून उपचार घेण्यास नकार देण्यात आला आहे. तर, डॉक्टरांनी सलाईन लावण्याची विनंती केली, पण सलाईन घेण्यासही त्यांनी नकार देत आपले प्राणांतिक उपोषण सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे, ओबीसी समाज बांधवांकडून हाके यांच्या उपोषणस्थळी गर्दी होत आहे.

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे यांच्या उपोषणाचा मंगळवारी सहावा दिवस होता. जिल्हा शल्य चिकित्सकाच्या पथकाने उपोषणस्थळी जाऊन त्यांच्या शारिरीक प्रकृतीची तपासणी केली. हाके यांच्या शरिरातील शुगर आणि पाणी पातळी खालवल्यामुळे त्यांना चक्कर येत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान त्यांना उपचाराची गरज असल्याचे डॉक्टरांनी म्हटले आहे. मात्र, डॉक्टरांच्या आग्रहानंतरही हाके यांनी उपचारास नकार दिला.

### शिष्टमंडळ मुंबईला गेलेच नाही

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने सोमवारी (दि.१७) वडीगोद्री येथे ओबीसी बचाव आंदोलनाला भेट दिली. यावेळी शिष्टमंडळाने उपोषणकर्ते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची भेट घेऊन उपोषण सोडून मंत्रिमंडळ बैठकीला येण्याचा आग्रह केला. परंतु उपोषणकर्त्यांनी नकार देत सरकारसोबत चर्चा करण्यासाठी पाच जणांचे शिष्टमंडळ पाठवणार असल्याचे सांगितले होते. मात्र मंगळवारी (दि.१८) उपोषणाच्या सहाव्या दिवशी लक्ष्मण हाके यांनी आपण असे कोणतेही शिष्टमंडळ पाठवणार नसल्याचे सांगितल्याने उपोषणकर्त्यांच्या वतीने कोणतेही शिष्टमंडळ मुंबईला गेले नाही. सरकारसोबत चर्चा करण्यासाठी शिष्टमंडळाची गरज नसून मुख्यमंत्र्यांच्या प्रतिनिधीने येथे येऊन महाराष्ट्राला समजावून सांगावे की, मराठा समाजाला आरक्षण दिले तर ओबीसी आरक्षणाला कसा धक्का बसत नाही. तसे लेखी दिले तर आम्ही उपोषण मागे घेऊ. ओबीसी आरक्षणाला धक्का पोहोचणार नाही, राज्यपालांच्या सहीचं लेखी हमीपत्र देण्याची मागणी ही हाके यांनी केली आहे.

## पान १वरून...

### यंदाही 1 रुपयातच

क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे (कूळाने अगर भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसह) सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. पीक कर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक राहील, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पिक विमा पोर्टल वर नोंदणीकृत भाडे करार अपलोड करणे आवश्यक आहे. या योजनेत आपण जे पीक शेतात लावले आहे त्याचाच विमा घ्यावा. शेतात विमा घेतलेले पीक नसेल तर आपणास विमा नुकसान भरपाई पासून वंचित राहावे लागेल. या वर्षी भात, कापूस, सोयाबीन पिकांमध्ये महसूल मंडल मधील पिकाचे सरासरी उत्पादन नोंदवताना रीमोट सेसिंग तंत्रज्ञान चा वापर करून येणाऱ्या उत्पादनास ४० टक्के भारांकन आणि पीक कापणी प्रयोग द्वारे आलेल्या उत्पादनास ६० % भारांकन देऊन मंडळाचे सरासरी उत्पादन निश्चित केले जाणार आहे. अर्ज करण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक आहे, पिक विम्यातील अर्ज हा आधार वरील नावाप्रमाणेच असावा, पिक विम्यातील नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या विमा पोर्टल द्वारे आधार संलग्न बँक खात्यामध्ये करण्यात येते. यासाठी आपले बँक खाते आधार संलग्न पेमेंट मिळण्यासाठी अधिकृत असणे आवश्यक आहे. याकरिता आपले बँक मॅनेजर माहिती देऊ शकतात, आधार कार्ड वरील नाव व बँक खात्यावरील नाव सारखे असावे, विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रति अर्ज एक रुपया प्रमाणे रक्कम सीएससी चालकांना देणे अभिप्रेत आहे.

-----------

### शेतकरी सन्मान योजनेचा

शपथ घेतल्यावर शेतकरी सन्मान योजनेच्या फाईलवर स्वाक्षरी करुन कामाला सुरुवात केली होती. या योजनेतील १७ व्या हप्त्याची सुमारे २० हजार कोटी रूपयांची रक्कम तब्बल ९ कोटी २६ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली. कृषी सखी म्हणून प्रशिक्षित झालेल्या ३० हजाराहून अधिक बचत गट महिलांनाही पंतप्रधान प्रमाणपत्रांचे वितरण केले. केंद्र सरकारने आतापर्यंत पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेचे १६ हप्ते लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आहेत. १६ वा हप्ता २८ फेब्रुवारी २०२४ रोजी हस्तांतरित करण्यात आला होता.

-------

### पंकजा मुंडे यांच्यावर

त्यामुळे भाजपपासून ओबीसी समाज काही प्रमाणात का होईना दुर जात असल्याचे दिसत होते. तरी सुध्दा भाजपने वेगळे पाऊल उचलले नाही. महाराष्ट्रात ओबीसी चेहरा म्हणून पंकजा मुंडे यांच्याकडे पाहिले जाते. राज्यातील जवळपास २५ ते ३० विधानसभा मतदार संघावर त्यांचा प्रभाव आहे. पंकजा मुंडे यांची सभा घेतली की विजय मिळतो, याचा विश्वास त्या त्या मतदार संघातील उमेदवारांना असतो. सध्याची परिस्थिती पाहता राज्यात भाजपला विधानसभेतही संघर्ष करावा लागणार असल्याचे दिसते. शिवाय लोकसभा निवडणुकीत ओबीसी मते फुटल्याचा भाजपला बऱ्याच मतदार संघात फटका बसला आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत तरी ओबीसींची शंभर टक्के मते भाजपला पडावीत, यासाठी वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरु आहेत. त्यामुळे पंकजा मुंडे यांच्यावर येत्या आठवडाभरात राज्य भाजपात महत्वाची जबाबदारी दिली जाणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. मुंडे यांचे राजकीय पुनर्वसन झाले तर राज्यातील वंजारी समाजासह ओबीसी समाज भाजपच्या पाठीशी ताकदीने उभा राहू शकतो, असे म्हटले जात आहे.

--------

### मान्सून पुढील चार

दुष्काळी भाग असलेल्या जिल्ह्यांमध्ये चांगला पाऊस झाला असून, इतर भागात काहीच झालेला नाही. पुण्यासह राज्यात ढगाळ हवामान असून उन्हाचा चटका आणि उकाडा चांगलाच वाढलेला आहे. विदर्भामध्ये मात्र दमदार पावसाची प्रतिक्षा असून, मान्सून दाखल होऊन देखील पाऊस झालेला नाही. त्यामुळे पेरण्याही खोळंबल्या आहेत.

-------------

### ओबीसी बांधवांनी अडवला धुळे-सोलापुर महामार्ग

यांनी मनोज जरांगे यांच्यावर जळजळीत टिका केली. सरकार आंदोलनाची दखल घेत नसल्याने संतप्त झालेल्या ओबीसी बांधवांनी वडीगोद्री येथे धुळे-सोलापुर महामार्ग अडवला. यावेळी टायर रस्त्यावर जाळल्याने बराच वेळ वाहतुक विस्कळीत झाली होती. वडीगोद्री येथे प्रा. लक्ष्मण हाके यांच्या अमरण उपोषणाचा मंगळवारी सहावा दिवस होता. यावेळी प्रा. हाके चांगलेच आक्रमक झाले होते. ते म्हणाले, ओबीसी बांधवांनो कायदा हातात घेऊ नका, तुम्हाला सोडवायला कोणी आमदार खासदार येणार नाहीत. हिंसक आंदोलन करू नका, असे त्यांनी समाज बांधवांना आवाहन केले. पुढे ते म्हणाले, शासन बोगस सर्टिफिकेट वाटत आहे, शासन ओबीसींच नसेल तर आम्हाला जनतेच्या दरबारात जावे लागेल, असे ते म्हणाले. मनोज जरांगे यांच्याविषयी बोलताना हाके म्हणाले, आम्ही शंभर टक्के घुसलोय असे जरांगे म्हणत आहेत आणि शासन म्हणते की ओबीसी आरक्षणाला धक्का लागत नाही, मग महान नेते खरं बोलत आहेत की शासन खरं बोलतेय?, हे जनतेला अजून तरी कळले नाही. भुजबळ यांना टार्गेट करायचे आणि आम्हाला भाऊ म्हणायचं? आमच्या अन्नात माती कालवणारा तू आणि आम्हाला भाऊ म्हणतो.?, अशी जळजळीत टिका जरांगे यांच्यावर यावेळी हाके यांनी केली. राज्यभरातून उपोषणस्थळी ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने येत आहे. यावेळी संतप्त झालेल्या समाज बांधवांनी धुळे-सोलापुर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले.

-------------

### डिसेंबरपर्यंत अहिल्यानगर ते

आलेली असून काही ठिकाणी अर्धवट कामे करून पैसे उचलले जात असल्याचे समोर येत आहे. यामुळे अधिकाऱ्यांनी कामे दर्जेदार करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत. गावात पाणी देणे हे पुण्याचे काम असून सदरील कामे करताना सामान्य माणसाला पाण्यासाठी फिरण्याची वेळ येऊ येणार नाही अशा सूचना केल्या. अशा काही तक्रारी आल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही, असे म्हणत अर्धवट कामांची पंधरा दिवसात प्रगती दाखविण्याच्या सुचना त्यांनी दिल्या. शिवाय जलजीवन योजनेसाठी लागणारा निधी आणण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करू, पैशाची काळजी करू नका, असेही म्हटले. याच बरोबर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना, सर्व शिक्षा अभियान आणि बचत गटांचाही आढावा घेण्यात आला.बचत गटाच्या माध्यमातुन केंद्र शासकीय योजना अधिकाधिक कुटुंबापर्यंत पोचवणार, असा शब्दही खा.सोनवणे यांनी दिला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी वासूदेव सोळंके, डॉ.उल्हास गुंडाळ, शिक्षणाधिकारी फुलारी, शिंदे यांची उपस्थिती होती. यानंतर रेल्वे अधिकाऱ्यांच्या बैठकीस आहिल्यानगर येथील रेल्वे विभागाचे उपमुख्य अभियंता श्री. आर.के.यादव व रेल्वेचे सर्व अधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी खा.सोनवणे यांनी आढावा घेत जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या रेल्वे प्रश्नावर चर्चा केली. यावेळी डिसेंबरपर्यंत अहिल्यानगर ते बीड रेल्वे ट्रायल रन पुर्ण होणार असे त्यांनी ठामपणे सांगितले. याच बरोबर बीड- परळी रेल्वे मार्गाचे काम एक वर्षाच्या आत पुर्ण करा, रेल्वेचे कार्यालय बीड येथे आणन्यासाठी करावयाच्या योजनाची माहिती घेतली. त्यासाठी जे जे करता येईल ते करा, भुसंपादनाचे विषय तातडीत मार्गी लावा अशी तंबीही अधिकाऱ्यांना दिली. यावेळी लीड बँकेची देखील बैठक घेण्यात आली. जिल्ह्यात शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज द्या, कोणत्याही शेतकऱ्याची अडवणूक झाल्याची तक्रार आली किंवा त्यात तथ्य आढळले तर गाठ माझ्याशी आहे, असा इशाराही त्यांनी दिला. जिल्ह्यातील मराठा समाजातील तरूणांना उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाकडून कर्ज द्या, त्यांना स्वत:च्या पायावर उभा राहू द्या, असेही खा.सोनवणे म्हणाले.

----------

### भाजपशासित राज्ये बनली

करुन तरुणांचे भविष्य सुरक्षित करण्याची हमी दिली होती. आता आम्ही विरोधी पक्षाची जबाबदारी पार पाडत देशभरातील तरुणांचा आवाज संसदेत पोहोचवणार आणि सरकारवर दबाव टाकून अशी कठोर धोरणे बनवण्यास भाग पाडणार असा दावाही त्यांनी यावेळी केला.

-------------

### विधान परिषदेच्या ११

जानकर, शेकापचे जयंत पाटील, शिवसेना उबाठाचे अनिल परब, कॉंग्रेसच्या प्रज्ञा सातव, वजाहत मिर्झा हे ११ सदस्य निवृत्त होत आहेत. या सर्व विधान परिषद सदस्य विधानसभा सदस्यांमधून निवडूण विधान परिषदेत गेले होते. मात्र मध्यंतरीच्या काळात शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात झालेल्या फुटीच्या पार्श्वभूमीवर आता दोन्ही पक्षांतील बरेचसे संख्याबळ हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी सोबत आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत आहेत. त्यामुळे या निवडणूकीत शरद पवार गटाकडून आणि उद्धव ठाकरे यांच्या गटाचे उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता जवळपास नाही. विधान परिषदेच्या या निवडणूकीसाठी २५ जून रोजी नोटीफिकेशन जारी होईल, तर २ जुलै पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारिख राहणार आहे. तर अर्जाची छाणनी ३ जुलै रोजी होईल ५ जुलै रोजी अर्ज मागे घेण्याची तारिख आहे. १२ जुलै रोजी या रिक्त जागेसाठी मतदान घेण्यात येणार असून, त्याच दिवशी संध्याकाळी निकाल जाहिर करण्यात येणार आहेत. विधान परिषदेच्या एकूण ११ जागांसाठी आणि निधन झालेल्या आणि खासदारपदी निवडूण केलेल्या आमदारांमुळे विधानसभेचे २७४ आमदार विधान परिषदेच्या उमेदवारांना मतदान करणार आहेत. त्यामुळे विजयासाठी प्रत्येक विधान परिषदेच्या आमदाराला २३ मते मिळविणे आवश्यक ठरणार आहे. ज्या विधान परिषदेच्या उमेदवाराला २३ मते मिळतील तोच उमेदवार निवडूण येऊ शकतो.

**टी.सी. हरवला आहे.**

रविंद्र भाऊसाहेब भवर या नावाचा १२ विज्ञान पासचा टि.सी बीड ते अहमदनगर प्रवासा दरम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**-:::संपर्क:::-**

**पता: मु.पो.सुकळी ता.शेवगाव जि.अहमदनगर**

**मो.९१४५७६४०९९**

**टी.सी. हरवला आहे.**

पृथ्वीराज अनिल जाधव या नावाचा पाटोदा हायस्कूल पाटोदा ता.बीड. या उच्चमाध्यमिक विद्यालयाचा बारावी विज्ञान पासचा टि.सी बीड ते अहमदनगर प्रवासा दरम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**-:::संपर्क:::-**

**मो. ७०५७६९७७९०**

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि.१९ जून २०२४



## शहागडच्या पुलाखाली पाण्यात अनओळखी मृत्यूदेह सापडला



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई व गोंदी पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका ( ३० वर्षीय ) यूवकाचा मृत्यूदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे दोन्ही पोलिस ठाण्याचे पोलिस यांनी घटना स्तळावर धाव घेतली असल्याची माहिती आहे तसेच या व्यक्तीचा खून करूण मृत्यूदेह शहागड च्या पूलाखाली फेकला आहे सदरची घटना ही आज ( दि ७ वाजता ) उघडकीस आली आहे दरम्यान या मृताची ओळख अद्याप पटली नसून गेवराई व गोंदी पोलिस या बाबदचा अधिक तपास करत आहेत.

# ज्ञान आणि विज्ञानात झेप घेण्याची ताकद असते-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

दिवसेंदिवस विज्ञानाची प्रगती होऊ लागली आहे. गुणवत्तेवर प्रत्येक विद्यार्थी आपले कौशल्य दाखवत पुढे जात आहे. झेप घेण्याची ताकद ज्ञान आणि विज्ञानात असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

आदर्श शिक्षण संस्थेच्या वतीने रामकृष्ण लॉन्सच्या सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात सुप्रसिद्ध व्याख्यात्या डॉ.प्रतिमा श्योरे यांचेही मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. कालिदास थिगळे तर विलास बडगे, नानासाहेब काकडे, रोहित क्षीरसागर, अरुण डाके, गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे, विजुताई महिंद्रे, सुधाकर मिसाळ, डॉ.अरुण भस्मे, अर्जुन बहिरवाळ, अरुण बोंगाणे, शिवाजीराव जाधव, उषाताई सरवदे, विलास विधाते, राणा चौव्हाण, मुखीद लाला आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.राजा मचाले यांनी केले तर संस्थेत शिक्षण घेत असलेल्या गायत्री जगताप, श्रावणी दहिवाले, अथर्व भांगे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच ॲड. कालिदास थिगळे, विजुताई महिंद्रे, विशाल गायके यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, १९५५ साली स्व.काकूंनी आदर्श शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ही शिक्षणाची गंगा आणली. जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी आणि विद्यार्थिनी घडवून स्वयंपूर्ण करणारी संस्था म्हणून नावारूपाला आली आहे. दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात बदल होऊ लागले आहेत. गुणवत्तेवर आधारित प्रत्येक विद्यार्थी पुढे जात आहे. त्यामुळे झेप घेण्याची ताकद ज्ञान आणि विज्ञानात आहे. आपल्या संस्थेबरोबरच बीड शहरातील मिलीया संस्थेतील गुणवंतांचा देखील आपण गौरव केला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत पालकांचा महत्त्वाचा वाटा असतो त्यामुळे पालक



मेळावा देखील ठेवला आहे. गुणवत्ता ही कुठल्या जातीवर ठरत नसते कुठलीही जात असो ओलांडून गुणवत्ता जो मिळवतो तोच पुढे जातो. या संस्थेतून दहावी वर्गातून बत्तीस हजार विद्यार्थी तर इयत्ता बारावी वर्गातून ४२ हजार विद्यार्थी यश मिळवून पुढे गेले आहेत. आई-वडिलांनंतर शिक्षक हाच गुरु असतो खुल्या जगात गुणवत्ता हीच आयुष्यात भरारी घेणारे माध्यम आहे. पूर्वी डॉक्टर आणि इंजिनियर झालं की मोठं कौतुक व्हायचं पण आज त्याही पुढचे शिक्षण सहज उपलब्ध झाले आहे. बीडमध्ये एमबीबीएस शिक्षणाची व्यवस्था व्हावी यासाठी आपण वैद्यकीय महाविद्यालयाची मागणी केलेली आहे. जगाच्या पाठीवर ज्ञानविज्ञानासह अनेक उपक्रम सुरू झाले आहेत. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा अभ्यास करून भविष्यातील तंत्रज्ञानाचा फायदा घ्यावा. आदर्श शिक्षण संस्थेने गुणवत्तेचा दर्जा टिकवला असून नव्या पिढीच्या दृष्टीने नवनवीन उपक्रम देखील हाती घेतले आहेत. जसे शिक्षण सुरू असते तसा अभ्यासक्रमाही बदलत जातो. त्या दृष्टिकोनातून शिक्षक वर्ग देखील त्याच पद्धतीने काम करत आहे असे सांगून त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना डॉ.प्रतिमा श्योरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्याला घडवत असताना प्रथम त्याला कोणते शिक्षण घ्यायचे याची निवड करावी लागते. नसता पुढे जे करायचे त्यासाठी लागणार्या विषयाचे शिक्षण तेव्हा त्याच्याकडे उपलब्ध नसते. दिवसेंदिवस टेक्नॉलॉजीत प्रचंड बदल होऊ लागला आहे. पहिले शिक्षण पूर्ण होईपर्यंत पुढचा बदल दिसू लागला आहे. अध्ययनात गोडी आवश्यक असते जे काम करायचे त्यास आपली तयारी आणि आवड असायला हवी हजारो मार्ग आहेत. कुठलातरी एक मार्ग कोणी म्हणतो म्हणून निवडू नका तुम्हाला जे व्हायचे आहे . त्यासाठी मेहनत आणि अभ्यास असायलाच हवा स्वतःला समजून घेत जाणून घेत तशी तयारी विद्यार्थ्यांनी करायला हवी. जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तर शिक्षणामुळे अडचणी निर्माण होऊ नयेत याची खबरदारी घ्यायला हवी,पालकांनी देखील आपल्या पाल्याला त्याच्या आवडीचे शिक्षण देणे महत्वाचे आहे. नसता व्हायचं होत पण शिकतोय इंजिनिअरिंग मग त्यात तो यशस्वी होतो की नाही. प्रत्येक गोष्टीत प्लॅनिंग महत्वाची आहे ती इयत्ता दहावीपासूनच हवी,पाया मजबूत असेल तर ज्ञानाची बिल्डिग उभी राहते असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे प्रशासक डॉ.राजा मचाले, कार्यवाह एम.ए.राऊत, सखाराम मस्के, सुभाष क्षीरसागर, विजय सरवदे, सुग्रीव रसाळ, विकास चौधरी, राम भांडवलकर, सिध्देश्वर आर्सुळ, चंद्रकांत पेंढारे, सुरेश काशिद, आदर्श शिक्षण संस्थेतील सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकरी महिलेचा शॉक बसून मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

दोन दिवसांपूर्वी झालेल्या वादळात गहूखेल येथील शेतातील विद्युत खांब खाली पडला. पण महावितरणने खांब तर तसाच ठेवला शिवाय विद्युत प्रवाह देखील बंद केला नाही. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे शेतात कामासाठी गेलेल्या ५० वर्षीय महिलेचा विद्युतवाहिनीला स्पर्श झाल्याने सोमवारी सायंकाळी मृत्यु झाला. हौसाबाई प्रल्हाद साखरे रा.गहुखेल असे मृत महिलेचे नाव आहे.

आष्टी तालुक्यातील गहूखेल येथील हौसाबाई प्रल्हाद साखरे (५०) या सोमवारी शेतात काम करत होत्या. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी झालेल्या वादळाने शेतात पडलेल्या खांबावरील विद्युत पुरवठा महावितरणने बंद केला नव्हता. याची



कसलीच कल्पना हौसाबाई यांना नव्हती. सोमवारी सायंकाळी नेहमीप्रमाणे काम करताना खांबावरील विद्युत तारेला स्पर्श झाल्याने हौसाबाई यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पती,दोन विवाहित मुली असा परिवार आहे.

महावितरणचा निष्काळजीपणा

सदरील महिलेच्या शेतातून महावितरणची लाईन गेलेली आहे. वादळात याच शेतात विद्युत खांब पडल्याने तारा शेतात पसरल्या होत्या.महावितरणने विद्युत प्रवाह बंद न केल्याने हालगर्जीपणा केल्याने हा मृत्यू झाल्याचे वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा महासचिव बाळासाहेब गायकवाड यांनी सांगितले.

## राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकरांनी आदर्श राज्यकारभार करून जगासमोर आदर्श निर्माण केला -तुकाराम येवले

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकमाता राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकरांनी स्वतःच्या खजानातून आपल्या संस्थानपुरते काम न करता त्यांनी जम्मू कश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत लोककल्याणकारी व मानव जातीच्या कल्याणासाठी आदर्श असा राज्यकारभार करून जगासमोर आदर्श निर्माण केला असल्याचे मत शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी व्यक्त केले. मार्तंड बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व मल्हारी मार्तंड अर्बन पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव स्नेह मिलन व सत्कार सोहळ्याचे दिनांक १७ जून रोजी



सायंकाळी सात वाजता सस्थेसमोर आयोजित केलेल्या कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप करताना येवले बोलत होते या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून संपादक बंडुजी खांडेकर प्रमुख पाहुणे म्हणून बबनराव सरवदे सभापती कल्याणराव आबुज ह भ प शिवाजी महाराज गडदे बालासाहेब देवकते अँड आरतीताई कांडुरे मीनाक्षीताई देवकते संपतराव हराळ डॉ भारतराव वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ भेट देऊन फेटा बांधून सत्कार करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना बंडू खांडेकर म्हणाले की स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत करून अभ्यासात सातत्य ठेवुन पालकांच्या चेहऱ्यावर हसू फुलेल असे मोठे यश संपादन करण्याचे आवाहन केले. यावेळी ह भ प शिवाजी महाराज गडदे मिनाक्षी देवकते बाळासाहेब सोनसळे कल्याणराव आबुज यांचेही समयोचित भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले तर सूत्रसंचालन लक्ष्मण सरवदे व गोविंद गोचडे यांनी केले आभार संस्थेचे चेअरमन विशाल देवकते यांनी मानले या कार्यक्रमास किसनराव हराळ अंकुशराव घाडगे नारायणराव सातपुते आदिनाथ शास्त्री कुंडकर उद्धव कुंडकर खोडवे सर भागवत गायकवाड ॲड. सजगणे भागवत वगरे ज्ञानोबा कुकडे आबासाहेब वगरे खोडवे सर डॉक्टर रूपालीताई शिंदे आशोक कावळे राजेभाऊ आबुज स्वप्नील देवकते विलास कांडुरे दत्तात्रय काळे निकीता होके यांच्यासह समाजातील महिला पुरुष विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पं.उद्धव आपेगावकर यांच्या पखवाज वादनाने रसिक मंत्रमुग्ध

### प्रसिद्ध गायक आसाराम जोशी यांच्या अभंगवाणीने वातावरण भक्तीमय

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

वारकरी सांप्रदायातील प्रचलीत वादनाला शास्त्रीय वाद्याची जोड देत आंतरराष्ट्रीय किर्तीचे पखावज वादक पं.उद्धव आपेगावकर यांनी उपस्थितांना तालाचे विविध प्रकार व वेगवेगळ्या लय उपस्थितांसमोर सादर करून भक्ती व ज्ञान यांचा अनोखा संमग घडविला. तर प्रसिद्ध गायक आसाराम जोशी व त्यांच्या सहकार्यांनी अभंगवाणीच्या कार्यक्रमातून परिसरातील वातावरण भक्तीमय केले.

श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे संतगुरू संत श्री.ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २४ व्या



पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी चाकरवाडी येथे आंतरराष्ट्रीय किर्तीचे पखवाज वादक पं.उद्धव आपेगावकर यांच्या पखवाज वादनाचा कार्यक्रम झाला. यावेळी आपेगावकर यांनी वारकरी सांप्रदायाच्या वादनाची प्रचलित तीन ताल ही भजन,किर्तन, दिंडी, भारूड या मधील ताल त्यांनी सांप्रदायातील जाणकारांसमोर उलगडुन सांगितला. भक्ती व ज्ञानाचा संगम तसेच वारकरी सांप्रदायातील वादन व शास्त्रीय वाद्य यातील फरक त्यांनी उपस्थितांना सांगुन तालाचे विविध प्रकार व वेगवेगळ्या लय उपस्थितांसमोर सादर केल्या.

यावेळी प्रसिद्ध गायक आसाराम जोशी व गायिका मीना सोमवंशी यांनी आपल्या अभंगवाणी या कार्यक्रमातून रामकृष्ण हरिच्या गजराने अभंगवाणीचा प्रारंभ केला. सुंदर ते ध्यान उभा विटेवरी... आरंभी वंदीन आयोध्येचा राजा... विष्णुमय जग... असे विविध रचना व अभंग सादर करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी त्यांना तबल्यावर रत्नदीप शिगे तर हार्मोनियमवर सनतकुमार बडे, विष्णु मानवतकर यांनी सातसंगत केली.

## कै. श्रीहरी ठोसर यांच्या ३२ व्या पुण्यस्मरणार्थ वृक्षारोपण संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

कै श्रीहरी आप्पाराव ठोसर यांचे काल ३२ वे पुण्यस्मरण होते त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त शिवसंग्राम महिला आघाडीच्या वतीने बीड शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण व विविध उपक्रम राबवून कै श्रीहरी आप्पाराव ठोसर यांचे पुण्यस्मरण साजरे केले.

याबाबत अधिक माहिती अशी की काल शिवसंग्राम महिला आघाडीच्या शहर उपाध्यक्षा सौ. संगीता हरिश्चंद्र ठोसर यांचे सासरे कै.श्रीहरी आप्पाराव ठोसर यांचे ३२ वे पुण्यस्मरण होते. त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त शिवसंग्राम महिला आघाडीच्या वतीने बीड शहरातील शाहूनगर भागातील माळे गल्ली च्या बाजूला असलेल्या पांडुरंग रेसिडेन्सी येथील वार्ड क्रमांक १ मध्ये वृक्षारोपण केले. यावेळी कै. श्रीहरी आप्पाराव ठोसर यांच्या विविध आठवणींना उजाळा देऊन त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी शिवसंग्रामच्या महिला आघाडीच्या शहर उपाध्यक्षा सौ. संगीता हरिश्चंद्र ठोसर यांच्यासह सौ. अश्विनी कचरू चांभारे, सौ. सारिका दत्तात्रेय भगत, सौ. सुनीता संतोष जोगदंड, सौ. वर्षा शिंदे मंगल प्रताप, सौ जोशना भोरे यांच्यासह सर्व महिला पदाधिकारी व शिवसंग्राम चे कार्यकर्ते उपस्थित होते.

## मर्यादा,प्रेम,आपुलकी,संस्कार, त्याग,प्रचंड इच्छाशक्ती,असीम धैर्य,पराक्रम यांचा उत्तम संगम म्हणजे रामायण -रामायणाचार्य ह.भ.प.आक्रुर महाराज साखरे

**आष्टी । प्रतिनिधी**

मर्यादा,प्रेम,आपुलकी,संस्कार, त्याग,प्रचंड,इच्छाशक्ती,असीम धैर्य,पराक्रम यांचा उत्तम संगम म्हणजे रामायण.अयोध्येचा राजा असूनही रामाला वनवासात जावे लागले.श्रीविष्णूंचा सातवा अवतार म्हणून श्रीरामांकडे पाहिले जाते मात्र असे असले तरी मानवी जीवनातील सर्व भोग श्रीरामांना भोगावे लागले.राम समजून घेण्यासाठी 'राम' म्हणेपर्यंत मेंदू आणि देह झिजवला तरी त्यामधील काहीच भाग आपल्या हाती लागेल.मर्यादा,प्रेम,आपुलकी, संस्कार,त्याग,प्रचंड,इच्छाशक्ती, असीम धैर्य,पराक्रम यांचा उत्तम संगम म्हणजे रामायण असे प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प.आक्रुर महाराज साखरे यांनी सांगीतले.

आष्टी येथील माऊली नगरात २० व्या.शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे २४ व्या.पुण्यतिथीनिमित्त व संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या सप्तशत्तकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त अखिल भारतीय वारकरी मंडळाचे प्रेरणाने ज्ञानेश्वरी पारायण,अखंड हरिनाम सप्ताह व संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरु आहे.या भावपुर्ण कथेत ते बोलत होते.

यावेळी माजी आ.भीमराव धोंडे ,सौ. दमयंतीताई भीमराव धोंडे, माजी आ.साहेबराव दरेकर,विठ्ठलराव बन्सोडे, बलभीम सुंबरे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज,ह.भ.प. दिनकरराव तांदळे,सरपंच सौ.मुळे, माजी सरपंच आदिकाताई लोखंडे, गोविंद महाराज पवार,प्राचार्य चंद्रकांत गोसावी, सोनाजी बनकर महाराज,शरद रेडेकर,कपीलशेठ अग्रवाल,दत्तात्रय निंबाळकर,बलभीम धोंडे, मनोज निंबाळकर आंबा गांगुर्डे सचिन मुळे सागर धोंडे बिडवे बाबा, महेश चौरे अशोक मुळे सरपंच सरपंच परिवंत गायकवाड,अशोक बळे,प्राचार्य के.बी.खाडे,हौसराव आजबे ,ज्ञानेश्वरी केरुळकर,खाडे सर,भाऊसाहेब कोकणे उपस्थित होते. रामायणाचार्य ह.भ.प.आक्रुर महाराज म्हणाले की,घर हे मंदीर बनविणारी रामकथा आहे.घरात देव आणणारी रामकथा आहे.जीवनात सुख आले तरी आणि दुःख आले तरी साधुकडे जा..साधुकडुन सोडवणुक होतेच. मैत्री टिकविण्यासाठी स्पष्ट बोलणे, समाज जिंकण्यासाठी गोड बोलणे आणि शत्रू संपविण्यासाठी कपट लागते.निंदारुपी दगड मागुन येतो. स्तुतीरुपी दगड समोरुन येत असतो.स्तुतीरुपीदगड चुकविता येतो मात्र निंदारुपी दगड चुकविता येत नसतो.संतानी भक्ती केली आणि देवाने अनेक अवतार घेऊन चरित्र केले म्हणुन अलौकिक कार्य करणाऱ्यांचेच मग ते धार्मिक क्षेत्र असो अथवा सामाजिक क्षेत्र असो लोकहितासाठी झटणारे नेते असो अथवा देश पारतंत्र्यातुन स्वतंत्र करणारे राष्ट्रभक्त असो त्यांचे अलौकिक कार्य आहे.संत व देवाचे चरित्र असते सामान्यांचे चरित्र नसते.संत,देव आणि अलौकिक कार्य करणाऱ्यांचेच चरित्र होत असते असेही ह.भ.प.साखरे महाराज म्हणाले.नवविधा भक्ती ज्या घरात होत असते तेथे भगवंताचे आगमन होत असते.काम,क्रोध व लोभ हे तीन विकार गेल्याशिवाय खरी देवाची भक्ती करता येत नाही.पापाचा बाप लोभ असतो.भगवंताचा सहवास फक्त पुर्व पुण्याईने मिळतो.संत हे जगताच्या उध्दारासाठी,हितिसाठी मृत्यू लोकात येतात.गुरु देवापेक्षा श्रेष्ठ असतो,गुरुची निंदा केलेली सहन करु नये.या सप्ताहात भजन,कीर्तन,अन्नदान आदीसह अध्यात्मिक कार्यक्रम होत आहेत. या रामकथेस हजारो भावीकभक्त उपस्थित असतात.हा सप्ताह यशस्वी पार पाडण्यासाठी माऊली सेवा मंडळ सदस्य व नागरिक परिश्रम घेत आहेत.

## पान ६ वरून...

### सोशल मीडियावर वाढली

कोरोना महामारीनंतर सोशल मीडियाचा वापर अनेक पटींनी वाढला आहे. डिजिटल युगाचा आपल्या आरोग्यावर तसेच आपल्या जीवनावर मोठा परिणाम झाला आहे. कोरोनाच्या काळात लॉकडाऊन लागू झाल्याने लोकांचा सोशल मीडियाकडे अधिक कल वाढला आणि त्यामुळे सामाजिक अंतर वाढू लागले.या अचानक झालेल्या बदलाचा आपल्या जीवनावर परिणाम झाला.सोशल मीडियाच्या अतिवापराने अनेक परस्पर भावनिक पैलू नष्ट केले आहेत आणि त्याच वेळी अनेक प्रकारच्या गंभीर मानसिक वेदनांना जन्म दिला आहे.

### पतंजली योग समितीच्या

झाले होते. अत्यंत चुरशीच्या पद्धतीने बीड शहरात पहिल्यांदाच ही स्पर्धा संपन्न झाली . स्पर्धा नंतर लगेच निकाल जाहीर करण्यात आला.स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना २१ जून २०२४ रोजी आशीर्वाद लॉन्स बीड येथे सकाळी सहा वाजता होणाऱ्या दहाव्या जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमात प्रमाणपत्र ,मेडल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात येणार आहे.स्पर्धा पंच म्हणून विकास गवते, प्रा.अंबादास फटांगरे ,प्रवीणा पोकळे,प्रा.माधव काळकुटे ,अविनाश इगडे ,राधिका वझे ,संतोष पडोळे सुरेखा सरोदे यांनी काम पाहिले. स्पर्धा आयोजन करण्यासाठी पतंजली योग समितीचे जिल्हा प्रभारी नितीन गोपण, विकास गवते, हेमा विभुते,रत्नाकर कुलकर्णी, पुरुषोत्तम एरंडे, आर वी. वजुरकर, विलास घोडके, राजेंद्र गाडेकर, चंद्रकांत माने, बाबासाहेब कुडके, रामचंद्र ठोसर यांचे सहकार्य लाभले.

### मुलांना त्यांच्या आवडीच्या

ऋग्वेद यांचे वडील प्रा आर वाय कुलकर्णी यांनी व्यक्त केले.यावेळी पेशवा प्रतिष्ठान चे पदाधिकारी डॉ महेश अकोलकर, डॉ संकेत तोरंबेकर, श्रीकांत जोशी , अक्षय देशमुख, राघव कुलकर्णी, पार्थ कांसुरकर सौ कल्याणी कुलकर्णी, रेणुका भालेराव, रोहिणी जड यांची उपस्थित होते..

### पाच जिल्ह्यात दुचाकी चोरणारे

कसून चौकशी केली असता त्यांनी माजलगाव शहर येथील एक दुचाकी चोरी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्या दुचाकीबाबत माजलगाव शहर ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंद असल्याची माहिती मिळाली. संशय आल्याने तिघांकडे पोलीसांनी विचारपूस करताच त्यांनी दुचाकी चोरीचा आलेखच पोलीसांसमोर मांडला. या टोळीने तीन इसमांना अधिक विचारपुस केली असतां त्यांनी पुणे जिल्ह्यातून २, जालना ५, छत्रपती संभाजीनगर २, सातारा जिल्ह्यातून ५ व परभणी जिल्ह्यातून २, अशा एकूण १६ दुचाकी चोरी केल्याची माहिती दिली. या सर्व दुचाकी त्यांच्याकडून पोलीसांनी ताब्यात घेत जप्त केल्या.

यांनी केली कामगिरी

ही कामगिरी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अपर अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा पो.नि.संतोष साबळे माजलगाव शहर ठाणे निरीक्षक केतन राठोड, उपनिरीक्षक संजय तुपे, सहायक फौजदार हनुमंत खेडकर, पोह.कैलास ठोंबरे, नसिर शेख, अशोक दुबाले, भागवत शेलार, देविदास जमदाडे, तुषार गायकवाड, निलेश ठाकुर, मच्छिंद्र बीडकर, पोशि/बप्पा घोडके, विकी सुरवसे, चालक गणेश मराडे यांनी केली.

cmyk

# दिल्लीतून ठरलेले कांद्याचे दर कमीच, शेतकऱ्यांचा कांदा नाफेडला नाही

केंद्र सरकारच्या बफरस्टॉकसाठी शेतकऱ्यांकून खरेदी केल्या जाणाऱ्या कांद्याचे दर यापूर्वी नाफेडच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून ठरवले जात होते. मात्र, आता नाफेड कांदा खरेदीचे दर दिल्लीतून ठरणार आहेत. त्यामुळं शेतकऱ्यांचा फायदा होणार असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. पण, प्रत्यक्षात आजही बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या कांद्याला लिलावात मिळणाऱ्या दरापेक्षा नाफेडचे दर कमी असल्याचे मत महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे प्रमुख भारत दिघोळे यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळं शेतकऱ्यांकडून नाफेड कांदा दिला जाणार नसल्याचे दिघोळे म्हणाले.

सध्या कांद्याला किती मिळतोय दर?

मागील दोन आठवड्यांसाठी नाफेडच्या कांदा खरेदीचे प्रतिक्विंटलसाठी शेतकऱ्यांना दिला जाणारा दर हा २१०५ रुपये होता. तर आज मंगळवारी दिल्लीतून ग्राहक संरक्षण मंत्रालयाने या आठवड्यासाठी नाफेड कांदा खरेदीचा दर २५५५ रुपये प्रति क्विंटल इतका ठरवला आहे. आज नाशिक जिल्ह्यासह महाराष्ट्रातील बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या कांद्याला लिलावात २८०० ते ३००० पर्यंत प्रतिक्विंटलचा दर मिळत आहे. नाफेडच्या माध्यमातून सरकार बफर स्टॉकसाठी कांदा खरेदीचे



दर मात्र बाजार समित्यांमध्ये मिळणाऱ्या दरापेक्षा कमी देत आहे. शेतकऱ्यांकडून नाफेड व एनसीसीएफला कांदा दिला जाणार नाही, असे स्पष्ट मत महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी व्यक्त केले आहे.

बाजार समितीत कांदा विकणं शेतकऱ्यांना परवडते

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, नाफेडचा कांदा खरेदीचा या आठवड्यासाठीचा दर हा २५५५ प्रतिक्विंटल इतका आहे. मागील दोन आठवडे हा दर २१०५ प्रतिक्विंटल इतका होता. मात्र, बाजार समितीत कांद्याला मिळणार दर हा नाफेडच्या दरापेक्षा जास्त आहे. त्यामुळं शेतकऱ्यांना बाजार समितीत कांदा विकणे परवडत आहे. त्यामुळं शेतकऱ्यांचा कांदा हा नाफेडला देणार नसल्याची भूमिका भारत दिघोळे यांनी मांडली आहे.

**कांद्याच्या दरासंदर्भात नाफेड आणि एनसीसीएफचे अधिकार गोठवले:** कांद्याच्या दरासंदर्भात नाफेड आणि एनसीसीएफचे अधिकार गोठवले आहेत. कांद्याचे दर आता थेट वाणिज्य मंत्रालय ठरवत आहे. यापूर्वी कांद्याचे दर हे नाफेडमार्फत ठरवले जात होते. मात्र, लोकसभा निवडणुकीत कांद्याच्या दरासंदर्भाचा मोठा फटका महायुतीला बसला आहे. त्यामुळं आता थेट वाणिज्य मंत्रालयाकडून कांद्याचे दर निश्चित केले जात आहेत. कांद्याला बाजार समितीपेक्षा कमी दर नाफेड आणि एनसीसीएफ देत असल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. केंद्र सरकारकडून नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून कांदा खरेदी होते.

## शेट्टींना शेतकऱ्यांचं काही देणघेणं नाही

### ते खासदारकीसाठी लढत होते-खोतांचा हल्लाबोल





राजू शेट्टी हे शेतकऱ्यांसाठी नव्हे तर खासदारकीसाठी लढत होते असं वक्तव्य रयत क्रांती संघटनेचे प्रमुख सदाभाऊ खोत यांनी केलं आहे. शिराळामध्ये हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील माने यांच्या सत्कार सभेमध्ये सदाभाऊ खोत बोलत होते. यावेळी त्यांनी राजू शेट्टींवर जहरी टीका केली.

नेमकं काय म्हणाले सदाभाऊ खोत?

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार धैर्यशील माने यांनी राजू शेट्टींचा पराभव केला. यानिमित्त धैर्यशील माने यांचा सत्कार सोहळा शिराळमध्ये आयोजीत केली होता. या कार्यक्रमात बोलताना सदाभाऊ खोत यांनी राजू शेट्टींवर जहरी टीका केली. लोकसभा निवडणुकीत पाठिंबा मागण्यासाठी मी महाविकास आघाडीकडे गेलो होतो. सतेज पाटील आणि जयंत पाटील यांना मी निवडून आलो तर महाविकास आघाडीबरोबरच राहीनं असं लिहून देतो असे राजू शेट्टी म्हणाले होते, असं सदाभाऊ खोत म्हणाले. जो माणूस म्हणत होता मी अपक्ष राहणार आहे, मी कोणाच्याच आघाडीत जाणार नाही, मी शेतकऱ्यांसाठी लढणार आहे, मी शेतकऱ्यांचा उमेदावर आहे, पण त्याच माणसानं जयंत पाटील आणि सतेज पाटलांना लिहून दिलं होतं की, मी तुमचाच गुलाम राहणार आहे, असं म्हणत खोतांनी शेट्टींवर टीका केली. त्यामुळं राजू शेट्टी हे शेतकऱ्यांसाठी नाहीतर खासदारकीसाठी लढत होते असेही खोत म्हणाले.

## मध्य महाराष्ट्रासह मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा यलो अलर्ट

### हवामान विभागाचा आजचा अंदाज काय?

राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. काही भागात चांगला पाऊस पडत आहे. तर काह भागात अद्याप चांगला पाऊस झाला नसल्याचे चित्र आहे. दरम्यान, आज राज्याच नेमकी काय परिस्थिती असले याबबातची माहिती हवामान विभागानं दिली आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, आज मध्य महाराष्ट्रासह मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती खबदारी घ्यावी, असं आवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

दरम्यान, मागील तीन चार दिवसात राज्यातील काही भागात मुसळधार पाऊस झाला आहे. अनेक ठिकाणी नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. तर काही ठिकाणी पावसामुळं जनजीवन विस्कळीत झाल्याचं देखील पाहायला मिळालं. दरम्यान या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन देखील सतर्क आहे. प्रशासनाने सगळी तयारी देखील केली आहे. दरम्यान, ज्या भागात चांगला पाऊस झालाय, त्या भागात शेती कामांना वेग आल्याचे पाहायला मिळत आहे.

कोकणासह मुंबई आणि उत्तर महाराष्ट्रात आज पावसाची शक्यता कमी

हवमान विभागानं दिलेल्या माहितीनुसार कोकणासह मुंबई आणि उत्तर महाराष्ट्रात आज पावसाची शक्यता कमी आहे. काही भागात ढगाळ वातावरण राहणार आहे. कोकणात



फक्त सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मात्र, हा भाग सोडता संपूर्ण महाराष्ट्रात आज पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळं या भागात आज मुसळधार पावसाची शक्यता आहे.

विदर्भात मान्सूनच्या प्रगतीला ब्रेक

सध्या मान्सूनने कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व्यापला आहे. तर विदर्भाच्या काही भागात म्हणजे पश्चिम विदर्भाच मान्सून सक्रिय झाला आहे. मात्र, अद्याप मान्सूनने संपूर्ण विदर्भ व्यापला नसल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. विदर्भात मान्सूनच्या प्रगतीला सध्या ब्रेक लागला आहे. पुढच्या दोन ते तीन दिवसात मान्सून संपूर्ण विदर्भात सक्रिय होण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करु नये

दरम्यान, ज्या भागात चांगला पाऊस झाला आहे, त्या भागात शेती कामांना वेग आला आहे. शतकरी खरीपाची पेरणी करत आहे. मात्र, ज्या भागात चांगला पाऊस झाला नाही, त्या भागातील शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करु नये, असं आवाहन कृषी विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे. दरम्यान, जोपर्यंत १०० मिलीमीटर पावसाची नोंद होत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणी करु नये अशी माहिती कृषी अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# टोमॅटोची 'लाली' वाढली! दरात दुपटीनं वाढ, शेतकऱ्यांना होतोय फायदा

सध्या टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना चांगले दिवस आले आहेत. कारण टोमॅटोच्या दरात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. कांदा आणि बटाट्यापाठोपाठ आता टोमॅटोच्याही दरात वाढ झाल्यानं, शेतकऱ्यांना फायदा होत आहेत. तर दुसरीकडे ग्राहकांना थोडा फटका बसत आहे. गेल्या दोन-तीन आठवड्यात टोमॅटोचे दर दुपटीने वाढले आहेत. त्याचा परिणाम उत्तरेत फारसा दिसत नसला तरी येत्या काही दिवसांत देशभरात टोमॅटोच्या किमती वाढण्याची शक्यता आहे.

टोमॅटोच्या दरात वाढ होण्याचं कारण काय?

काही दिवसांपूर्वी कांदा आणि बटाट्याच्या दरात वाढ झाली होती. आता टोमॅटोचे भाव वाढ झाली आहे. विशेष म्हणजे देशाच्या अनेक भागात टोमॅटोचे भाव दोन ते तीन आठवड्यांत दुपटीने वाढले आहेत. टोमॅटोच्या दरातील वाढ ही महाराष्ट्रासह दक्षिणेकडील कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि केरळमध्ये दिसून आली आहे. वाढती उष्णता आणि कमी उत्पादन हे टोमॅटोच्या दरात वाढ होण्याचं कारण आहे.

टोमॅटोचा दर ४० ते ५० रुपये किलोवर

मिळालेल्या माहतीनुसार, घाऊक बाजारात टोमॅटोचा सरासरी दर ४० ते ५० रुपये किलोवर



पोहोचला आहे. मात्र, कडक उन्हामुळं वेगानं पिकणाऱ्या टोमॅटोचा अतिरिक्त पुरवठा होत असल्यानं उत्तर भारतातील राज्यांमध्ये टोमॅटोच्या दरात कोणतीही वाढ झालेली नाही. मात्र, दक्षिण भारतात टोमॅटोचा पुरवठा आणि वाढतं ऊन यामुळं टोमॅटोच्या दरात मोठी वाढ झाल्याचे दिसत आहे.

दक्षिणेकडील राज्यांमध्ये टोमॅटोच्या दरात वाढ

दक्षिणेकडील राज्यांमध्ये टोमॅटोच्या सरासरी घाऊक किमती ३५ ते ५० रुपये प्रति किलोच्या दरम्यान आहेत, तर कर्नाटकातील काही बाजारपेठांमध्ये टोमॅटोचे दर ६० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. गेल्या दोन-तीन आठवड्यांमध्ये आणि एक वर्षापूर्वीच्या तुलनेत किमती जवळजवळ दुप्पट झाल्या आहेत. बंगळुरूमध्ये रविवारी टोमॅटोची किरकोळ विक्री ८० रुपये किलोने होत होती.

उत्तरेकडील राज्यांमध्ये किमती कमी

यावर्षी तापमान ४२ ते ४४ अंश सेल्सिअस इतके राहिले. त्यामुळे फुले व फळे खराब झाली. त्यामुळं उत्पादनावर परिणाम दिसून येत आहे. उत्तर भारतात किमती अजूनही नियंत्रणात आहेत. उत्तरेकडील राज्ये अद्यापही उष्णतेच्या प्रभावाखाली असल्याने टोमॅटो झाडांवर वेगाने पिकत आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांची काढणी करावी लागत आहे. त्यामुळे बाजारपेठेत पुरवठा वाढतो आहे. त्यामुळं तिथे किंमती नियंत्रणात आहेत.

उष्णतेमुळे टोमॅटोच्या उत्पादनावर परिणाम

टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, उष्णतेमुळे टोमॅटोच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. बंगळुरु प्रदेशाच्या आसपास काढण्यात येणारे नवीन पीक टोमॅटोचे भाव येत्या काही दिवसात ठरवेल.

जुलै ते ऑक्टोबर दरम्यान टोमॅटोचे भाव उच्चांकावर असतात. पावसाळ्यात टोमॅटोचे पीक अगदी लहान भागात घेतले जाते. पावसाळ्यात अत्यंत मुसळधार पावसामुळे पिकांचं नुकसान होतं. त्यामुळं पुरवठा कमी असतो परिणामी दरात वाढ होते.




### महत्वाच्या घटना

१५७६ : मुघल शासक अकबर आणि महाराणा प्रताप यांच्यात हळदी घाटीच्या युद्धाला सुरुवात झाली.
१७७६ : महाराणा प्रताप व अकबर यांच्यात 'हळदी घाटा' ची सुप्रसिध्द घनघोर लढाई झाली.
१८१५ : वॉटर्लूच्या लढाईत नेपोलियनचा दारुण पराभव
१८३० : फ्रान्सने अल्जीरिया ताब्यात घेतले.
१९०८ : फिलीपाइन्स विश्वविद्यालाची स्थापना झाली.
१९३० : चीनचा सम्राट डोवागर लोंग्यू याने देशातील सर्व परदेशी व्यक्तींना ठार करण्याचा हुकूम दिला.
१९४६ : डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोव्याच्या मडगाव शहरातून गोवा मुक्तीचे रणशिंग फुंकले. या घटनेच्या स्मरणार्थ पणजींतील एका रस्त्याला '१८ जून रस्ता' असे नाव देण्यात आले आहे.
१९५६ : रँग्लर र. पु. परांजपे पुणे विद्यापीठाचे दुसरे कुलगुरू झाले.
१९८१ : जनावरांमधे आढळणार्या लाळ्या-खुरकुत रोगावरील पहिली जनुकीय लस विकसित झाली.
१९८३ : अंतराळवीर सैली राइड या अंतराळात प्रवास करणाऱ्या पहिल्या अमेरिकन महिला आहेत.
१९८७ : एम. एस. स्वामिनाथन यांना प्रथम जागतिक अन्न पुरस्कार (वल्ड फूड) मिळाला.
२००६ : कॅझसॅट या कझाकस्तानच्या पहिल्या उपग्रहाचे प्रक्षेपण.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध घेण्यासाठी विशेष उपग्रह पाठविला.
२०१३ : भारताच्या उत्तराखंड राज्यात मुसळधार पाउस पडून मंदाकिनी व अलकनंदा नद्यांना महापूर. शेकडो मृत्युमुखी, हजारो बेघर.
२०१७ : किदम्बी श्रीकांतला इंडोनेशिया सुपर सीरिजचे जेतेपद भारतीय बॅडमिंटनपटू किदम्बी श्रीकांतने इंडोनेशिया सुपर सीरिज प्रिमिअरच्या पुरुष एकेरीत जेतेपद पटकावले. असे करणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.
२०१७ : भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्रीने समकालीन खेळाडूंमध्ये सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : राजपूत नेपाळ शासक तसचं, नेपाळचे पहिले पंतप्रधान व राणा राजवंशाचे संस्थापक जङ्गबहादुर राणा यांचा जन्मदिन.
१८८७ : थोर भारतीय स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी, शिक्षक, राजनीतिज्ञ, तसचं, बिहार राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री डॉ.अनुग्रह नारायण सिन्हा यांचा जन्मदिन.
१८९९ : शंकर त्रिंबक तथा 'दादा' धर्माधिकारी स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक (मृत्यू: १ डिसेंबर १९८५)
१९११ : कमला सोहोनी पहिल्या भारतीय महिला शास्त्रज्ञ (मृत्यू: ८ सप्टेंबर १९९७)
१९३१ : के. एस. सुदर्शन प्रखर राष्ट्रवादी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ५ वे सरसंघचालक (मृत्यू: १५ सप्टेंबर २०१२)
१९३१ : ब्राझील देशाचे समाजशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि राजकारणी तसचं, ब्राझील देशाचे माजी राष्ट्रपती फर्नांडो हेन्रिक कार्डोसो यांचा जन्मदिन.
१९३४ : भारतीय वंशीय संगणक वैज्ञानिक, बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थान, संगणक विज्ञान विभागाचे माजी प्राध्यापक ई.वी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन.
१९४२ : पॉल मॅकार्टनी संगीतकार, संगीतसंयोजक, वादक, गीतलेखक, 'बीटल्स'चा सदस्य
१९४२ : थाबो म्बेकी दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष
१९६५ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (मृत्यू: २२ जुलै २००३)
१९८६ : फ्रेंच व्यावसायिक टेनिसपटू रिचर्ड गॅब्रिएल सायर गैस्के यांचा जन्मदिन.
१९८७ : इंग्लंड देशाचे महान क्रिकेटपटू मोईन अली यांचा जन्मदिन.
१९९४ : युवा भारतीयह टेनिसपटू प्रार्थना गुलाबराव ठोंबरे यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : मणिकर्णिका तांबे ऊर्फ 'राणी लक्ष्मीबाई' झाशीची राणी इंग्रजांचा पाठलाग टाळण्याच्या प्रयत्नात झालेल्या चकमकीत मृत्यूमुखी पडल्या (जन्म: १९ नोव्हेंबर १८२८)
१९०१ : रामचंद्र भिकाजी गुंजीकर 'मोचनगड' या मराठीतील पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे लेखक आणि 'विविध ज्ञानविस्तार' मासिकाचे संपादक (जन्म: १० एप्रिल १८४३)
१९०२ : सॅम्युअल बटलर इंग्लिश लेखक (जन्म: ४ डिसेंबर १८३५)
१९३६ : मॅक्झिम गॉर्की रशियन लेखक (जन्म: २८ मार्च १८६८)
१९५८ : डग्लस जार्डिन इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ आक्टोबर १९००)
१९६२ : जे. आर. तथा नानासाहेब घारपुरे पुण्याच्या विधी महाविद्यालयाचे संस्थापक आणि प्राचार्य, नामवंत विद्वान (जन्म:)
१९७४ : सेठ गोविंद दास स्वातंत्र्यसैनिक, लोकसभेचे हंगामी सभापती, साहित्यिक (जन्म: १६ आक्टोबर १८९६)
१९९९ : श्रीपाद रामकृष्ण काळे ५२ कादंबर्या आणि ११०० हुन अधिक कथा लिहिणारे साहित्यिक, कथा आणि कादंबरीकार (जन्म: )
२००३ : जानकीदास हिन्दी चित्रपटातील चरित्र अभिनेते (जन्म: १९१०)
२००५ : भारतीय क्रिकेटपटू मुश्ताक अली यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९१४)
२००९ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९६९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (जन्म: १४ एप्रिल१९२२ शिबपूर, कोमिल्ला, बांगला देश)
२०२० : लच्छमानसिंग लेहल मेजर-जनरल वीर चक्र, परम विशिष्ठ सेवा (जन्म: ९ जुलै १९२३)
२०२१ : मिल्खा सिंग द फ्लाइंग शीख, धावपटू पद्मश्री (जन्म: ८ ऑक्टोबर १९३५)

# लिंबागणेशकरांनी १८ जून शेतकरी पारतंत्र्य दिवस पाळला

## शेतकरी विरोधी कायदे रद्द करा

लिंबागणेश । प्रतिनिधी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला.२६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना स्वीकारली गेली.या राज्यघटनेत सर्वांना मुलभूत अधिकार देण्यात आले होते.मात्र अवघ्या दिड वर्षात १८ जुन १९५१ ला निर्वाचित नव्हे तर काळजीवाहू सरकारने पहिली घटना दुरुस्ती खरंतर बिघाड करत घटनेत नसलेले परीशिष्ट ९ जोडण्यात आले.अनुच्छेद ३१ (अ)व (ब) नुसार परीशिष्ट ९ मधील समाविष्ट कायद्यांच्या विरोधात न्यायालयात जाता येणार नाही अशी तरतूद आहे.

आज परिशिष्ट ९ मध्ये २८४ कायदे असुन त्यापैकी २५० हुन आधिक कायदे थेट शेतकऱ्यांशी निगडित आहेत.ही घटना दुरुस्ती शेतकऱ्यांना कर्दनकाळ ठरली असुन तिचा परीणाम म्हणून लाखों शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे. हा घटना बिघाड १८ जुन १९५१ रोजी करण्यात आला यांच्या निषेधार्थ किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या मार्गदर्शनात डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली २०१८ पासुन ग्रामस्थांच्या वतीने १८ जुन ''शेतकरी पारतंत्र्य दिवस''पाळण्यात येतो. आज दि.१८ मंगळवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर दंडाला काळ्या फिती लावून व शेतकरी विरोधी कायद्यांची माहिती ग्रामस्थांना देत शेतकरी पारतंत्र्य दिवस पाळण्यात आला. शेतकऱ्यांसाठी गळफास ठरणारे त्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत ठरलेले, कमाल शेतजमीन धारणा(सीलिंग), आवश्यक वस्तू कायदा, जमीन अधिग्रहण कायदा ३ प्रमुख शेतकरी विरोधी कायदे रद्द करण्यात यावेत अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, कृषीमंत्री, विभागीय आयुक्त यांना ईमेल द्वारे करण्यात आली.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, अर्जुन घोलप, विक्रांत वाणी, संतोष भोसले, संतोष वाणी, सय्यद अख्तर,रामदास मुळे, गणेश थोरात, सोनु शिंदे,कचरू निर्मळ आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर आदि ग्रामस्थ सहभागी झाले होते.



**शेतकरी पारतंत्र्यात कसा? :** देशातील अन्य सर्व नागरिकांना आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात कोर्टात दाद मागता येते परंतु शेतकऱ्यांना नाही.प्रत्येक उत्पादक आपल्या मालाची किंमत स्वतः ठरवू शकतो परंतु शेतकऱ्यांना आपल्या मालाची किंमत ठरवता येत नाही.कोणाच्या मालमत्तेला कोणीही धक्का लावु शकत नाही.सरकार सुद्धा नाही.पण सरकार शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन ईतर कोणालाही देऊ शकते.आपल्या उत्पादन साधनाचा आकार किती लहान किंवा मोठा असावा,हे ठरविण्याचा अधिकार संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिला आहे परंतु तो आधिकार शेतकऱ्यांना नाही.मग शेतकरी स्वतंत्र कसा?? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे आजही शेतकरी पारतंत्र्यात आहे.



# खडतर प्रवासातून यशाचा मार्ग सापडतो

## सत्कार : पप्पु कागदे यांनी व्यक्त केले मत

बीड । प्रतिनिधी

क्षेत्र कोणतेही असो त्यात करिअर घडवित असताना विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे अथक परिश्रम घ्यावेत. कारण याच श्रमातून अन्? खडतर प्रवासातून यशाचा मार्ग सापडतो. असल्याचे मत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी व्यक्त केले. बीड येथील रिपाइंच्या मध्यवर्ती कार्यालयात मंगळवार (दि.१८) रोजी शिद्धोधन विक्रांत जोगदंडच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी उपस्थितांना संबोधित करताना पप्पु कागदे बोलत होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना पप्पु कागदे म्हणाले की, शिद्धोधन जोगदंडने एमएचटी सीईटी परीक्षेत ९९ टक्के गुण घेवून मिळविलेले यश बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. स्पर्धेच्या अतिशय गतीमान युगात त्यांनी हे यश संपादीत केले आहे. कारण शिक्षण घेत असतांना,प्रचंड आत्मविश्वास अंगी ठेवावा लागतो. स्वत:शी प्रामाणिकपणा ठेवून अभ्यास करावा लागतो. परीक्षेची तयारी करीत असताना अपयश आले म्हणून खचून न जाता पून्हा तेढ्याच उमेद्दीने तयारीला लागावे लागते. कारण याच खडतर प्रवासातूनच एक दिवस आयुष्यात असा दिवस नक्कीच येतो की, तुम्ही यशाची गोड फळे चाखाल्याशिवाय राहत नाहीत. पप्पु कागदे असेही म्हणाले की, शिद्धोधन जोगदंडने आगामी काळात आपले पद सदैव गरजवंताच्या कामी आले पाहिजे, अशा भावना पप्पु कागदे यांनी सत्कारावेळी व्यक्त केल्या.यावेळी राजू जोगदंड, विष्णू वाघमारे, मनोज मस्के, संदिपान डोंगरे,भगवान ससाणे, विलास जोगदंड, रंजित शिनगारे, आप्पा मिसळे, अक्षय कोकाटे, आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### लोकशाही दिनात एक तक्रार अर्ज दाखल

बीड : शासन आदेशान्वये महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. दि. १८ जून २०२४ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या महिला लोकशाही दिनात १ तक्रार अर्ज दाखल झाला असून एक तक्रार अर्ज निकाली निघाला असल्याचे महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

### परळी येथे समुपदेशन मेळाव्याचे आयोजन

बीड: कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था परळी वैजनाथ यांनी दिनांक २१ जून २०२४ रोजी सकाळी ११ वाजता तिरुपती मंगल कार्यालय शिवाजीनगर परळी वैजनाथ येथे समुपदेशन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १० वी १२वी नंतर भविष्यातील रोजगारांच्या संगीत व्यक्तिमत्व विकास बायोडाटा तयार करणे, मुलाखतीची तयारी नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण व रोजगारांच्या संधी, व्यवसायासाठी लागणाऱ्या लोन कर्जाबाबतची माहिती, करिअर प्रदर्शनी इत्यादी बाबत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ प्रोफेसर, टीचर, एनजीओ, यशस्वी उद्योजक यांच्यामार्फत मार्गदर्शन समुपदेशन करण्यात येणार आहे. तरी सर्व लाभार्थींनी वरील ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य परळी वैजनाथ यांनी केले आहे.

# शक्तिपीठ महामार्गास विरोध; बाधित शेतकऱ्यांची तीव्र निदर्शने




परळी । प्रतिनिधी

पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ महामार्ग मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यातून जात असून या महामार्गात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी जात असल्याने शेतकरी भूमिहीन होणार असल्याने या प्रस्तावित महामार्गाविरोधात परळी अंबाजोगाई तालुक्यातील बाधित शेतकरी एकजूट होत अंबाजोगाई उपविभागीय कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली.

नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्ग हा प्रस्तावित असून हा मार्ग अत्यन्त सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवड्यातील खूप मोठी बागायत जमीन या महामार्गामध्ये जाऊन कायमस्वरूपी शेतकरी भूमिहीन होणार आहेत.यामुळे पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ महामार्गास शेतकरी विरोध करत आहेत.याच अनुषंगाने १३ एप्रिल २०२४ रोजी परळी येथे मराठवाड्यातील बाधित शेतकऱ्यांची विभागीय बैठक संपन्न झाली होती.या महामार्गास विरोध दर्शविण्यासाठी मंगळवार दि १८ रोजी परळी व अंबाजोगाई तालुक्यातील बाधित असंख्य शेतकरी एकत्र येत अंबाजोगाई येथील उपविभागीय कार्यालयावर धरणव निदर्शने करत शक्ती पीठ महामार्ग रद्द करण्यात यावा यासाठी निवेदन देण्यात आले.या प्रसंगी अखिल भारतीय किसान सभा बीड जिल्हाध्यक्ष कॉ अजय बुरांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ऍड शिंदे तसेच परळी, अंबाजोगाई तालुक्यातील महामार्ग बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खुंटेफळ साठवण तलावास ४०० कोटी रुपये निधी मंजूर करावा

## आ. सुरेश धस यांची राज्य सरकारकडे मागणी

आष्टी । प्रतिनिधी

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक तीन खुंटेफळ साठवण तलावास आगामी पावसाळी अधिवेशनामध्ये ४०० कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारने करावी अशी विनंती पुरवणी मागण्याद्वारे आमदार सुरेश धस यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेल्या पत्रामध्ये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पास शासन निर्णय दिनांक १० ११ २०२२ अनुसार द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे बीड जिल्ह्यातील आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक तीन ही योजना या प्रकल्पाचा भाग आहे बीड जिल्ह्यातील कृष्णा खोऱ्यातील भूभाग असलेला आष्टी हा तालुका आवर्जून प्रवण क्षेत्रात मोडतो शाश्वत स्वरूपाच्या पिण्याचे पाणी व जलसिंचनाच्या लाभांपासून हा भाग आज पर्यंत वंचित आहे. या योजनेची उजनी ते थेट खुंटेफळ साठवण तलाव या पाईपलाईन व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत तसेच खुंटेफळ धरणाची कामे चालू आहेत या योजनेअंतर्गत दोन गावांचे पुनर्वसन व भूसंपादन आहे.

या सर्व कामाचा विचार करता आष्टी उपसा सिंचन योजनेस सन २०२४ २५ मध्ये ४०० कोटी रुपयांची तरतूद होणे आवश्यक आहे अन्यथा ही कामे रखडतील असेही या पत्राद्वारे आमदार झाल्यास यांनी म्हटले आहे आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक तीन या योजनेच्या काम झाल्यास प्रथम टप्प्यात १.६८ टीएमसी मर्यादित आठ हजार १४७ हेक्टर आष्टी तालुक्यातील क्षेत्रास पाणी मिळू शकेल व त्यामुळे बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कायमस्वरूपी दुष्काळ हटवण्यास मदत होईल त्यामुळे आगामी आर्थिक वर्ष सन २०२४ २५ मध्ये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक तीन या योजनेस ४०० कोटी रुपये इतका भरीव निधी उपलब्ध करण्याची विनंती पत्राद्वारे आ.सुरेश धस यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

# भारतीय काँग्रेस पक्षाच्या अभूतपूर्व यशाबद्दल खा.रजनी पाटील यांचा सत्कार



माजलागाव । प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय काँग्रेस पक्षाला अभूतपूर्व यश मिळत सर्वाधिक १४ खासदार निवडून आले असून, काँग्रेस पक्ष हा राज्यातील अव्वल क्रमांकाचा पक्ष झाला आहे.

काल ता.१७ रोजी अखिल भारतीय पक्षाच्या वरिष्ठ नेत्या तथा गांधी परिवाराच्या अत्यंत विश्वासू असणाऱ्या खासदार सौ. रजनीताई पाटील या जिल्हा नियोजन समितीची बैठक व कार्यकर्त्यांच्या भेटी गाठीचे औचित्य साधून जिल्हा दौऱ्यावर आल्या होत्या. यावेळी महाराष्ट्रातील भारतीय काँग्रेस पक्षाच्या अभूतपूर्व यशाबद्दल जिल्हा काँग्रेस तथा अखिल भारतीय काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या खासदार सौ. रजनीताई अशोकराव पाटील यांचं भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा परळी विधानसभा मतदार संघांचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी प्रमुख सहकार्यांच्या समवेत केज येथील ''शिवनेरी'' निवासस्थानी गुलाब पुष्पहार सह ह्रदय सत्कार केला. यावेळी खासदार रजनीताई पाटील यांनी कॉंग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी घेतलेले परिश्रमाचे आणि सर्वांगीण राजकीय पैलूवर लक्ष वेधत दत्ता कांबळे यांचे भरभरून कौतुक केले. यावेळी निवडणुकाच्या पार्शवभूमीवर चर्चा करत असताना परळी विधानसभा मतदार संघांचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी आगामी निवडणूक काळात खासदार रजनी पाटील,माजी मंत्री अशोकराव पाटील, जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आपण जीवाचं रान करू अशी ग्वाही खासदार रजनीताई पाटील यांना दिली. यावेळी जिल्हा काँग्रेसचे नेते आदित्य पाटील,जिल्हा उपाध्यक्ष राहुल सोनवणे पाटील, अनंत घडसिंगे, नानासाहेब कसबे, संकेत कासार सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# तीर्थक्षेत्र मंजूर निधी मागण्यांसाठी आमरणउपोषण सुरु

## जोपर्यंत तीर्थक्षेत्र निधी मागण्यांपुर्ण होत नाही उपोषण सुरुच-रोहन गलांडे

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज मंदिरासाठी तीर्थक्षेत्रासाठी ५० लाख रुपये निधी मंजूर झालेला असुन सुद्धा निधीचे वितरण केले जात नाही व मंदीराच्या विकास कामास सुरुवात केली जात नाही तरी निधीचे वितरण करुन मंजूर निधीच्या मागण्यांसाठी श्री संत नामदेव महाराज तीर्थ क्षेत्राचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे यासाठी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील दि.१७ /०६/२०२४ रोजी वेळ सायंकाळी ६ वाजता आमरण उपोषणास बसले आहेत या विषय सविस्तर वृत्त असे की केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील तीर्थक्षेत्र विकास कामांसाठी श्री संत नामदेव महाराज मंदिर चिंचोली माळी ता.केज जि.बीड तीर्थक्षेत्रासाठी ५० लाख निधी मंजूर झालेला असुन अनेक दिवसांपासून निधीचे वितरण करण्यस विलंब होत आहे व मंजूर निधीचे वितरण व्यवस्थेत होवून निधी खर्च करण्यात यावा या मागणीसाठी रोहन गलांडे पाटील श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे आमरण उपोषणाला बसले आहेत तरी रोहन गलांडे यांच्या मागण्या अशा आहेत की श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाचा मंजूर निधी श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्रा साठीच खर्च करण्यात यावा, तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण होईपर्यंत गावकऱ्यांची ऐक समीती असेल, तीर्थक्षेत्राचे काम निकृष्ट दर्जाचे होऊ नये याला जबाबदार काम करणारा गुत्तेदार जबाबदार राहील, तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण झाल्यानंतर गावकऱ्यांना खर्च झालेल्या निधीची माहिती देण्यात यावी.अशा मागण्या असुन रोहन गलांडे यांनी म्हटले आहे की चिंचोली माळी गावचा नागरीक म्हणून माझ्या एवढ्या मागण्या प्रशासनाला मान्य असतील तर मी माझ्या श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र निधी ५० लाख निधी साठी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण होईपर्यंत स्थगिती देणार आहे जर तीर्थ क्षेत्राच्या कामात काही त्रुटी शंका कुशंका वाटली , अडथळा आला तर मी परत उपोषणाला सुरुवात करणार उपोषना दरम्यान मला जर काही झाले तर सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई,केज व प्रशासन जबाबदारी राहील असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.




चौकट:-

सार्वजनिक बांधकाम विभाग केज, अंबाजोगाई यांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष कशामुळे करत आहे सर्वाजनिक बांधकाम विभागाचे गोडबंगाल काय श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास मंजूर निधीच्या उपलब्धतेनुसार मागण्या मंजूर करण्यास अडचण काय उपोषणा दरम्यान मला जर काही झाले तर सर्वस्व जबाबदार प्रशासनान असेल - रोहन गलांडे पाटील

# युसूफवडगांव येथुन मटक्या पाठोपाठ होतेय अवैध गुटखा विक्री

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव हे कळंब-अंबाजोगाई रोडवरील एक प्रमुख गाव असुन या आजुबाजुला असणाऱ्या गावांची हिच एक बाजारपेठ असुन या ठिकाणाहुन पोलिसांच्या मुक समंतीने मोठ्या प्रमाणात आजुबाजुच्या गावांना येथुन मोठ्या प्रमाणात अवैध गुटखा पार्सल करण्यात येत याकडे मात्र पोलिसांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.

युसूफवडगांव येथे मोठ्या प्रमाणात अवैध धंदे बोकाळे असुन याकडे मात्र स्थानिक पोलिसांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असुन यामुळे अवैध धंदे करणाराना एक प्रकारचे ते पाठबळ देत असल्याचे जाणवत आहे.अवैध धंद्याने कित्येकांचे आयुष्य व संसार होत आहेत त्यामुळे अशा अवैध धंद्यांना केव्हा आळा बसणार असे ग्रामस्थ विचारत आहेत.मटक्या पाठोपाठ येथुन आजुबाजुला असणाऱ्या गावांना येथुन मोठ्या प्रमाणात अवैध गुटखा पार्सल होत आहे.कित्येक तरूण यांच्या व्यसन लागुन ते व्यसनाधीन झाले आहेत पण



या गुटखा पार्सल करणारावर कारवाई होत नाही.युसूफवडगांव येथील २/३ ठिकाणाहुन हा अवैध गुटखा विक्री आणि पार्सल केला जातो पण याकडे मात्र युसूफवडगांव येथील स्थानिक पोलिसांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.आयपीएस पंकज कुमावत हे बदली होऊन गेल्यापासुन तर या अवैध गुटखा विक्रेत्यांना मैदान मोकळे झाले आहे.कारण यांच्या विरोधात आता कोणी बोलत नाही आणि कोणी बोलले तरी पोलिस त्यांच्यावर कारवाई करत नाहीत.तरी पोलिसांनी या अवैध गुटखा विक्रेत्यांवर योग्य ती कारवाई करून युवा पिढी व्यसनाधीन होणार याची काळजी घ्यावी असे ग्रामस्थांना वाटते.त्यामुळे पोलिस याच्यावर कारवाई करतात का नाही हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.?

# धनेगाव येथील ३३ केव्ही उपकेंद्रात ५ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मरचे आ.नमिता मुंदडा यांनी केले लोकार्पण

## बारा गावातील हजारो वीज ग्राहकांना होणार अखंडीत वीज पुरवठा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

धनेगाव येथील ३३ केव्ही उपकेंद्र अंतर्गत ५ अतिरिक्त पावर ट्रासफार्मरचे उदघाटन आ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नंदकिशोर मुंदडा व इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. नमिता मुंदडा म्हणाल्या की, ३३ केव्ही उपकेंद्र ओव्हरलोड झाल्याने उपकेंद्र अंतर्गत गावातील गावठाण व शेतीचा विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत होता. ५ एमव्हीए अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर सुरू झाल्याने गावठाण व शेतीचा विद्युतपुरवठा सुयोग्य दाबाने होणार आहे. धनेगाव सबस्टेशन परिसरातील १० ते १२ गावांमधील शेतकऱ्यांकडून सुरळित वीजपुरवठा होण्यासाठी सातत्याने मागण्या येत होत्या या अनुषंगाने आ. नमिता मुंदडा यांनी राज्य शासनाकडे अतिरिक्त रोहित्र मंजूर करण्यासाठी पाठपुरावा करून ते



मंजूर करुन घेतले होते. या ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन अतिरिक्त रोहित्राचे लोकार्पण आज करण्यात आले.

या नवीन रोहित्रामुळे धनेगाव सबस्टेश परिसरातील १० ते १२ गावांना उच्च दाबाने व अखंडित वीजपुरवठा होणार असल्यामुळे याचा हजारो शेतकऱ्यांना व घरगुती ग्राहकांना लाभ होणार आहे. तसेच केज मतदारसंघात आरडीएसएस योजनेअंतर्गत केज मतदारसंघात १४ नवीन ३३ केव्ही उपकेंद्र व १५ जुन्या ३३ केव्ही उपकेंद्रात आतिरिक्त ५ एमव्ही पॉवर ट्रान्सफार्मर व ६०० नवीन ट्रान्स्फॉर्मरचा प्रस्ताव शासनास पाठवला आहे. तसेच मुख्यमंत्री सौर योजनेत केज मतदारसंघात १० ठिकाणी सौर पॉवर प्लांट मंजूर आहेत त्याचे कामे लवकरच सुरु होणार आहेत,त्यानंतर त्या १० ठिकाणी अतिरिक्त ५ एमव्ही पॉवर ट्रान्स्फॉर्मर बसवण्यात येणार आहेत. त्यामुळे सदरील ३३ केव्ही उपकेंद्राअंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार आहे. राहिलेल्या ३३ केव्ही उपकेंद्रातही मुख्यमंत्री सौर योजना होणार असल्याचे ही आ. नमिता मुंदडा यांनी सांगितले. या कार्यक्रमास जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, महावितरणचे उप कार्यकारी अभियंता देशपांडे, जाधव साहेब सहाय्यक आभियंता यु.वडगाव, पंचक्रोशीतील उपस्थित सर्व शेतकरी बांधव,प्रमुख पदाधिकारी व मान्यवर यांच्यासह महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# माजलगावचे विकासकामे पाहून गुण नियंत्रक विभाग हैराण

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरात मागील एक वर्षाच्या कार्यकाळात कोट्यवधी रुपयांची रस्त्यांची कामे झाली आहे. मात्र ही कामे निकृष्ट झाल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, या केलेल्या कामाचे बील उचलण्यासाठी गुण नियंत्रकांकडून गुत्तेदार सांगतील तेथीलच तपासणी करत खराब निकृष्ट काम साडून ठरावीक ठिकाणी तपासणी करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत तक्रार केली गेली आहे.

माजलगाव शहरात मागील एक वर्षाच्या कार्यकाळात दलित वस्ती, नगरपालिका विकास फंड, जिल्हा नियोजन सह विविध योजनेच्या कामासाठी ६० ते ६५ कोटी रूपये खर्च करत रस्ते ,नाल्या , पेव्हर ब्लॉक बसवणे इत्यादी करण्यात आली. यातील काही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने तर काही कामे नगरपालिके मार्फत करण्यात आली. दोन्ही विभागामार्फत करण्यात आलेली कामे ही नित्कृष्ट दर्जाची करण्यात आली. ही कामे झाली असताना केवळ



आठ दिवसात रस्ते पूर्णत: उखडले. शहरात करण्यात आलेली कामे खराब होत असताना येथील लोकप्रतिनिधी , राजकीय नेते , सामाजिक संघटनांनी या विरोधात ब्र शब्दही काढला नाही. यामुळे संबंधित गुत्तेदारांकडून ही बिले उचलण्यासाठी आटापिटा सुरू केला आहे. न.पच्या कामाची गुण नियंत्रकाकडून शनिवारी १६ कामांची तपासणी करण्यात आली. दोन विभागात ही तपासणी करण्यात आली. ही तपासणी करतेवेळी गुत्तेदार त्यांच्यासोबतच होते. गुत्तेदार सांगतील तशा प्रकारची तपासणी हे गुण नियंत्रक करताना दिसून आले. खराब रस्ता झाला असतांना ठरावीक भागातील रस्त्याची तपासणी त्यांच्याकडून करण्यात आली. रस्ते तपासणीसाठी बीड येथील शासकीय तंत्रनिकेतन येथील अधिव्याख्याता प्रा.एस.बी. सय्यद, प्रा.डी.बी.करवट, प्रा.ए.जी.जाधव, प्रा.जे. एस. सय्यद उपस्थित होते.

# बकरी ईद निमित्ताने मुस्लिम बांधवाना मस्जिद येथे जाऊन राजकिशोर मोदी यांनी दिल्या शुभेच्छा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

त्याग व बंधुभावाचे प्रतीक असलेल्या बकरी ईद सणानिमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी मुस्लिम बांधवांच्या नमाज पठणानंतर शहरातील नूराणी मस्जिद व मर्कस मस्जिद येथे जाऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगरसेवक दिनेश भराडीया, सुनील वाघाळकर, कचरूलाल सारडा, गणेश मसने,विजय रापतवार, रफिक गवळी, दत्ता सरवदे, यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

मुस्लिम बांधवाचा महत्वाचा सण म्हणजे बकरी ईद.या ईद निमित्त मुस्लिम बांधव एकत्र येऊन शहरातील नूराणी मस्जिद तथा मर्कस मस्जिद व इतर मस्जिदमध्ये जाऊन सार्वजनिक नमाज पठण करतात. यामुळे



समाजाच्या ऐक्यभावाची जाणीव दिसून येते. हाच ऐक्यभाव जोपासत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी हे मागील तीस वर्षा पासून सामाजिक एकोपा जोपासत शहरातील इदगाह मैदानावर तसेच मस्जिद येथे जाऊन सर्व मुस्लिम बांधवाना हस्तांदोलन व गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा देतात. हाच सर्वधर्मसमभाव तसेच सामाजिक एकोपा जोपासत राजकिशोर मोदी यांनी यावर्षी देखील बकरी ईदच्या निमित्ताने सर्व मुस्लिम बांधवाना मस्जिद येथे जाऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. मोदी व उपस्थित त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी दिलेल्या शुभेच्छाचा स्विकार मुस्लिम बांधव हसतमुखाने स्वीकार करतांना दिसून येत होते. यावर्षी पावसामुळे शहरातील कुठल्याही इदगाह मैदानावर नमाज पठण व दुवा झाली नाही त्यामुळे राजकिशोर मोदी यांनी शहरातील मस्जिद येथे जाऊन मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या.

# माजलगावमध्ये दमदार पाऊस : पावसाचे पाणी अनेक दुकानात जाऊन,व्यापाऱ्यांचे लाखोंचे नुकसान

### तालुक्यातील नदी,नाले तुडुंब भरून वाहिले,तर सरस्वती नदीला पुर

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरासह तालुक्यात दि १७ जुन सोमवार रोजी पाहाटे झालेल्या धुव्वा दार पावसाने सगळीकडे पाणीच पाणी झाल्याने शहरातील अनेक दुकानात पाणी शिरल्याने आनेक व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसला असून यात लाखों रुपायांच्या मालाचे नुकसान झाले आहे,तर तालुक्यातील नदी,नाले तुडूंब भरुन वाहिले असुन याच पावसाने तालुक्यातील सरस्वती नदीला पूर आला आहे.




सध्या पावसाळा सुरु झाला असुन आजपर्यंत शहरासह तालुक्यात धुव्वादार पाऊस पडला नाही,मात्र दि १७ जुन सोमवार रोजी पाहाटे २:३० ते ३:३० वाजण्याच्या सुमारास झालेल्या धुव्वा दार पावसाने आनेकांची दाणादाण उडविली,या धुव्वा दार पावसाने शहरातील टवाणी कॉप्लेस,खान कॉप्लेससह इतर दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने अनेक व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांच्या मालाचे नुकसान झाले आहे.तर दुसरीकडे तालुक्यातील नदी,नाले तूंडूब भरुन वाहत आहेत,याच पावसाने तालुक्यातील देवळा,उमरी येथील सरस्वती नदीला पुर आला आहे.या धुव्वा दार झालेल्या पावसाने शहरातील व्यापाऱ्यांना मात्र आर्थिक फटका बसला आहे.तर दुसरीकडे मात्र या धुव्वादार पावसाने बळीराजा मात्र सुखावला आहे.

# पाच जिल्ह्यात दुचाकी चोरणारे त्रिकुट गजाआड

## विविध ठिकाणच्या चोरीच्या १६ दुचाकी जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; नऊ गुन्हे उघडकीस

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यासह पुणे, छत्रपती संभाजीनगर, जालना व सातारा या जिल्ह्यात दुचाकी चोरी करणारी आंतरजिल्हा टोळी उघड करण्यात बीड स्थानिक गुन्हे शाखेला यश आले. या टोळीतील त्रिकुटाला गजाआड करण्यात आले. त्यांच्याकडून चोरीच्या ९ लाख ९० हजार रुपये किमतीच्या १६ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. या चोरट्यांनी ९ गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

अभिजीत सटवा वाघमारे (वय २१), आदित्य सटवा वाघमारे (वय १९) व शहादेव भिवाजी अवघडे (वय २३ सर्व



रा.हिवरा, ता.माजलगाव) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींचे नाव आहेत. त्यांना पुढील तपासकामी माजलगाव शहर पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याकडील चोरीच्या एकूण १६ दुचाकीही माजलगाव पोलीसांच्या ताब्यात देण्यात आल्या असल्याचे पो.नि.संतोष साबळे यांनी बोलताना सांगितले.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून माजलगाव व गेवराई उपविभागातील दुचाकी चोरीतील आरोपींचा शोध सुरु होता. वरील तिघांनी काही दिवसांपुर्वी दुचाकी चोरी केल्या असून ते हिवरा पाट्याजवळ उभे असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानंतर छापा मारुन तिघांनाही पोलीसांनी ताब्यात घेतले. त्यांची ◀◀ पान ३ वर

# मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात काम करू देणे काळाची गरज –राहुल कुलकर्णी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नवोदित संगीतकार व्हि आर ऋग्वेद व गायिका ऋचा कुलकर्णी यांचा पेशवा प्रतिष्ठान तर्फे सत्कार करण्यात आला.अंबाजोगाई चे भूमिपुत्र असलेल्या संगीतकार व्हि आर ऋग्वेद व गायिका ऋचा कुलकर्णी यांनी नुकतेच प्रदर्शित झालेल्या मराठी चित्रपट अल्ल्याड पल्याड मध्ये संगीत व पार्श्वगायन दिलेले आहे. यानिमित्त दोन्ही बहीण भावंडांचा सत्कार करण्यात आला.यावेळी राहुल कुलकर्णी बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून कमलाकर देशपांडे, प्रा.पी. व्ही. कुलकर्णी,



प्रा रवींद्र पाठक, प्रा आर. वाय. कुलकर्णी, विभा कुलकर्णी यांची उपस्थिती होती... सत्काराला उत्तर देताना ऋचा कुलकर्णी म्हणाली की, लॉकडाऊन मध्ये सर्व जग ठप्प झाले होते, अश्यावेळी आम्ही वेळेचा सदुपयोग करून गायन व संगीत यावर भर दिला. एखाद्या चित्रपटात संगीत देणे ही फार मोठी उपलब्धि असल्याचे मत ऋग्वेद याने व्यक्त केले. पेशवा प्रतिष्ठान ने केलेल्या अश्या सत्कारामुळे मुलांना जिद्द आणि उमेद मिळते, ऋग्वेद व ऋचा यांच्या पुढील प्रवासाला दिलेल्या शुभेच्छा नक्कीच कामाला येतील असे मत ऋचा व ◀◀ पान ३ वर

# पतंजली योग समितीच्या वतीने बीड शहरात योगासन स्पर्धा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय बीड येथे दहाव्या जागतिक योग दिनाच्या निमित्ताने योगासन स्पर्धा संपन्न झाली. माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर , डॉ.अरुण भस्मे सर व ॲड.श्रीराम लाखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थी व नागरिकांमध्ये योगासनांची आवड निर्माण होण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते

काकू नाना प्रतिष्ठान, पतंजली योग समिती बीड व सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ही योगासन स्पर्धा घेण्यात





आली. स्पर्धेचे उद्घाटन काकु नाना प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड .कालिदास नाना थिगळे, केंद्रीय होमिओपॅथिक परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. अरुण भस्मे सर व पतंजली योग समिती बीडचे सर्वेसर्वा ॲड.श्रीराम लाखे पाटिल,महिला पतंजली योग समितीच्या राज्य कार्यकारणी सदस्य सौ .अनुपमा ताई कोरे ,बीड जिल्हा योग असोसिएशन चे अध्यक्ष विनायकराव वझे,महाराष्ट्र योगासन स्पोर्ट असोसिएशनचे सचिव डॉ. अंबादास फटांगरे, स्पर्धा संयोजक हेमाताई विभुते यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

मुले व मुलींच्या एकूण चार गटात ही स्पर्धा संपन्न झाली. बीड जिल्ह्यातील बीड शहर ,परळी,अंबाजोगाई ,केज, धारूर ,आष्टी येथील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी ◀◀ पान ३ वर

# सोशल मीडियावर वाढली अश्लीलता; मुले बिघडली

## कुटुंबातील संवाद झाला कमी, फेसबुक,इन्स्टाग्राम व युट्यूबवर नियंत्रण नसल्याने मोकळेपणाच्या नावाखाली अश्लीलता






**माजलगाव । प्रतिनिधी**

समाज माध्यमा वरील फेसबुक, इन्स्टाग्राम,यूट्युब यांसारखी समाजमाध्यमे सध्या लगाम नसलेल्या घोड्यासारखी आहेत.नियंत्रण नसल्याने मोकळेपणाच्या नावाखाली अश्लीलता पसरवली जात आहे.त्यामुळे कौटुंबिक संस्कार मोडीत निघाले असून मुले बिघडत चाललेने कुटूंबातील संवाद कमी होत आहे.

फेसबुक, इन्स्टाग्राम,यूट्युब यांसारखी समाजमाध्यमे सध्या लगाम नसलेल्या घोड्यासारखी आहेत.नियंत्रण नसल्याने मोकळेपणाच्या नावाखाली अश्लीलता पसरवली जात आहे.त्यामुळे कौटुंबिक संस्कार मोडीत निघाले असून मुले बिघडत आहेत.अभ्यासाच्या नावाखाली मुले अधिकाधिक वेळ मोबाइलवर रील आणि शॉर्ट्स पाहत आहेत.याचा सर्वांत घातक परिणाम म्हणजे मुलांचा त्यांच्या कुटुंबाशी असलेला संवाद सतत कमी होत चालला असल्याचे समोर आले आहे. मुलांच्या मनात गुन्हेगारी विचार वाढत आहेत. आक्षेपार्ह पोस्टवर नियंत्रण असायला हवे असे लोकांनी म्हटले आहे.

सोशल मीडियाच्या अतिवापराने परस्पर भावनिक पैलू नष्ट ◀◀ पान ३ वर

### सोशल मीडियावर अश्लीलतेला प्रोत्साहन

एका सर्वेक्षणात सहभागी ९७ टक्केपेक्षा अधिक लोकांनी सोशल मीडिया अश्लीलतेला प्रोत्साहन देत असल्याचे मान्य केले.याचा मुलांच्या मनावर नकारात्मक परिणाम होत आहे.

### ९३ टक्के जणांनी नको ती पोस्ट पाहिली

एका सर्वेक्षणात सहभागी ९३ टक्के लोकांनी मान्य केले की समाज माध्यमांवर त्यांनी कोणती ना कोणती आक्षेपार्ह पोस्ट पाहिली आहे. रील बनविण्याच्या स्पर्धेलाही ९४ टक्के जणांनी चुकीचे असल्याचे म्हटले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पोलिस शिपाई भरती सुरू; पुणे शहर, ग्रामीणमध्ये होणार नेमणूक

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर पोलिस आयुक्तालय, पुणे ग्रामीण पोलिस, पुणे लोहमार्ग पोलिस आणि कारागृह पोलिस शिपाई भरती प्रक्रियेस सुरवात झाली आहे. यामध्ये पुणे पोलिस आयुक्तालयाअंतर्गत शिपाई चालक संवर्गातील २०३ जागा, ग्रामीण पोलिस दलात पोलिस शिपाई पदासाठी ५१३ जागा, कारागृह विभागात कारागृह शिपाई पदासाठी ५१३ जागा आणि लोहमार्ग पोलिसांत ६८ जागेसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

पुणे पोलिस आयुक्तालयाअंतर्गत पोलिस शिपाई चालक संवर्गातील २०२ पदे भरण्यात येणार आहेत. याची भरती प्रक्रिया १९ जूनपासून शिवाजीनगर येथील पोलिस मुख्यालयात होणार आहे. यासाठी जानेवारी २०२४ मध्ये अर्ज भरून घेण्यात आले होते. मात्र अचारसंहिता व इतर कारणांमुळे प्रक्रिया सुरू झाली नव्हती. शिपाई चालक संवर्गासाठी २०२ जागा असून त्यासाठी २० हजार ३८२ अर्ज आले आहेत. यामधील ईएसईबीसी संवर्गाअंतर्गत नव्याने लागू झालेले मराठा आरक्षण दहा टक्के असणार असल्याची माहिती अपर पोलिस आयुक्त (प्रशासन) अरविंद चावरिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी उपायुक्त रोहिदास पवार उपस्थित होते.

भरतीसाठी कोणाच्याही प्रलोभनाला बळी पडू नये. भरती करून देण्याचे कोणी आमिष दाखवत असेल तर दक्षता अधिकारी हिम्मत जाधव (उपायुक्त विशेष शाखा) यांच्या ८९७५२८३१०० या क्रमांकावर संपर्क साधावा. ही प्रक्रिया १२ जुलै २०२४ पर्यंत चालणार आहे. २८ जून ते ०३ जुलै या दिवशी पुणे शहरात पालखी बंदोबस्त असल्याने त्या दिवशी भरती प्रक्रिया घेण्यात येणार नाही.



पुणे ग्रामीण पोलिस दलातील पोलिस शिपाई यांची ४४८ व चालक पोलिस शिपाई यांची ४८ रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. पोलिस शिपाई चालक या पदासाठी मैदानी चाचणी परीक्षा १९ जून ते २८ जून या कालावधीत घेण्यात येणार आहे. पोलिस शिपाई भरती प्रक्रियेमध्ये मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी आरएफआयडी या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे, त्यामुळे उमेदवारांची मैदानी चाचणी परीक्षा ही पारदर्शक व अचूक निर्णय होण्यासाठी मदत होणार असल्याची माहिती पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

कारागृह शिपाईपदासाठी ट्रान्सजेंडरचे अर्ज

कारागृह पश्चिम विभागासाठी कारागृह पोलिस शिपाई पदासाठी ५१३ जागा भरण्यात येणार आहेत. यासाठी १ लाख १० हजार ४८८ अर्ज आले आहेत. या पदांसाठी पाच ट्रान्सजेंडर व्यक्तींचे अर्ज आले आहेत. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार त्यांची शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे. ही प्रक्रिया पुणे पोलिसांची शिपाई चालक संवर्गातील भरती प्रक्रिया झाल्यानंतर राबविण्यात येणार आहे.

राज्य राखीव दलाच्या ३६२ पदांसाठी भरती

राज्य राखीव पोलिस बल गट क्रमांक २ पुणे येथील रिक्त असणार्या ३६२ शसस्त्र पोलिस शिपाईपदांसाठी भरती प्रक्रिया (दि. १९ जून) सुरू करण्यात येणार आहे. ही भरती बल गट क्रमांक २ च्या मैदानावर सुरू होणार आहे. बुधवारी पहाटे पाच वाजता कागदपत्रांसह अलंकारण हॉल येथील प्रवेशद्वाराजवळ उपस्थित राहावे, अशी माहिती समादेशक नम्रता पाटील यांनी दिली आहे.

लोहमार्गच्या ६८ जागांसाठी ३ हजार १८२ अर्ज

लोहमार्ग पोलिस शिपाई पदासाठी ६८ जागा असून, त्यासाठी ३१८२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. १९ जूनपासून या भरती प्रक्रिया सुरु होणार आहे. भरतीतील गैरप्रकार टाळण्यासाठी लोहमार्ग पोलिस भरतीदरम्यान तंत्रज्ञानाचा चोखपणे वापर करण्यात येणार आहे. यामध्ये मैदानी चाचणी दरम्यान प्रत्येक टप्प्यावर बायामेट्रिक तपासणी करूनच बक्कल नंबर मिळालेल्या उमेदवाराला पुढे मैदानी चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार आहे.

# पिंपरी शहर परिसरात तीन अपघात; दोघांचा मृत्यू

**पिंपरी । प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे, भोसरी आणि वाकड पोलिस ठाण्याच्या हद्दीत अपघाताच्या तीन घटना घडल्या आहेत. यामध्ये दोघांचा मृत्यू झाला असून एकाच्या पायावरून बस गेल्याने तो गंभीर जखमी झाला. याप्रकरणी रविवारी (दि. १६) संबंधित पोलिस ठाण्यात गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

तरूणाईत वेगाचं आकर्षण

तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्याच्या हद्दीत सोमाटणे फाटा येथे रविवारी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास अपघात झाला. रस्ता ओलांडत असलेल्या वीरभद्र रामराव शिरोळे (३८, रा. वराळे, ता. मावळ) यांचा मृत्यू झाला. आरोपी मयूर जालिंदर साखरे (३०, रा. हिंजवडी) याने त्याच्या ताब्यातील थार भरधाव वेगात चालवून शिरोळे यांना धडक दिली. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. शिरोळे यांच्या पत्नीने तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, मयूर साखरे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भोसरीमधील गावजत्रा मैदानात खासगी ट्रॅव्हल बसने एका तरुणाला धडक दिली. यात तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी (दि. १५) रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी हुसेनखा मेहताबखा पठाण (४२, रा. काळेवाडी, पिंपरी) यांनी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, बसचालक शुभम संजय सुरवसे (२५, रा. हडपसर) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी पठाण यांचा मुलगा गावजत्रा मैदानात नाश्ता करत असताना आरोपी सुरवसे याने त्याच्या ताब्यातील बस निष्काळजीपणे चालवत त्यास धडक दिली. बसचे चाक तरुणाच्या अंगावरून गेल्याने त्याचा मृत्यू झाला. भोसरी पोलिस तपास करीत आहेत.

# १३६ इन्फंट्री बटालियन (टीए) (इको) महारच्या भरती मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

मराठवाडा पर्यावरण बटालियन अंतर्गत येत असलेल्या १३६ इन्फंट्री बटालियन (टीए) (इको) महारमध्ये सशस्त्र दलातील माजी सैनिक, माजी महिला कर्मचारी, राज्य वन विभागाचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ५३ पदे भरावयाची असून संबंधितांनी भरती रॅलीत भाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संभाजीनगर मिलिटरी कँट (सर्वत्र स्टेडियम) येथे २३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत भरती प्रक्रियेचे आयोजन करण्यात येणार आहे. १३६ इन्फंट्री बटालियन (टीए) इको महार या बटालियन मध्ये सोल्जर जीडी (सामान्य कर्तव्य) ही ४२ पदे (महाराष्ट्र राज्य निवासी), लिपिक जीडी (सामान्य कर्तव्य) ६, हॉऊस किपर, लोहार, मेस किपर, कारागीर (लाकूड - कामगार), स्टेवार्ड (कारभारी) ही प्रत्येकी एक (संपूर्ण भारतातील निवासी) अशी एकूण ५३ पदे रॅलीच्या माध्यमातून भरावयाची आहेत. या बटालियनमध्ये भरती झालेल्या उमेदवारांना वृक्षारोपण उपक्रमात मराठवाडा विभागात तसेच पूर्ण देशात कर्तव्य बजावावे लागेल.

पात्रता/सेवेची अट पुढीलप्रमाणे: माजी सैनिक, पर्यावरण, वन आणि हवामान बदल विभाग व राज्य वन विभागाच्या माजी महिला कर्मचारी (अकाली सेवानिवृत्तांसह) यांना किमान वयाची अट नाही. मात्र, रॅलीमध्ये भाग घेताना सेवानिवृत्तीपासून ५ वर्षांच्या आत असावे. किमान सेवा २० वर्षे असावी. माजी सैनिक (इतर पदे) वयाच्या ५० वर्षापर्यंत भरतीस पात्र ठरतील. माजी सैनिक निवृत्तीवेतन धारक असावेत. उमेदवारांची वैद्यकीय श्रेणी १ मधील असावी. सेवानिवृत्तीच्या वेळी माजी सैनिकांचे चारित्र्य प्रशंसनीय आणि खूप चांगले असावे. पोलीस प्रकरणामध्ये कोणताही गुन्हा दाखल झालेला नसावा. भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन आणि उपदान मिळणार नाही. निवडलेल्या उमेदवारांना वैद्यकीय चाचणीला सामोरे जावे लागेल. उमेदवाराची शाररिक चाचणी नियमानुसार घेण्यात येईल. भरती मेळाव्यादरम्यान उमेदवारांना झालेल्या कोणत्याही अपघातास, दुखापतीस भरती करणारे प्राधिकारी जबाबदार राहणार नाही. उमेदवारांची निवड ही पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर केली जाईल. माजी सैनिकांचे पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ), डिस्चार्ज बुक, अलीकडील पासपोर्ट आकाराचे आठ रंगीत छायाचित्र, शिक्षण प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र व आधार कार्डची इत्यादी कागदपत्र उमेदवारांनी सोबत आणणे आवश्यक राहील.

इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक ९१६८१६८१३६ वर संपर्क साधून संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही १३६ इन्फंट्री बटालियन (टीए) (इको) महारचे लेफ्टनंट कर्नल एम.एस. नेगी यांनी केले आहे.

# विश्रामबाग वाहतूक विभागांतर्गत पार्किंग व्यवस्थेतील बदलाबाबतचे तात्पुरते आदेश जारी

**पुणे । प्रतिनिधी**

वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे सुरू राहण्याकरीता पुणे शहरातील विश्रामबाग वाहतूक विभागांतर्गत चिमण्या गणपती चौक, सदाशिव पेठ ते ना. पां. (नानासाहेब) करपे चौक, सदाशिव पेठ दरम्यान रस्त्याच्या दोन्ही बाजूस १५० मीटर अंतरावर पी १, पी २ पार्किंग व्यवस्था करण्यात आल्याचे तात्पुरते आदेश जारी करण्यात आले आहेत.

पार्किंग व्यवस्था बदलाबाबत या तात्पुरत्या आदेशाच्या अनुषंगाने नागरिकांच्या काही सूचना व हरकती असल्यास पोलीस उपआयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफिस, बंगला क्रमांक ६, जेल रोड, पुणे यांच्या कार्यालयात २० जूनपर्यंत लेखी स्वरूपात कळविण्यात याव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकतीवर विचार करून व अत्यावश्यक सेवेतील वाहने खेरीज करून वाहतूक बदलाबाबत अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतील, असे पोलीस उपआयुक्त रोहिदास पवार यांनी कळविले आहे.

# 'कीर्ती'च्या माध्यमातून मिळणार खेळाडूंना संधी

## 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात २२ ते २५ जून दरम्यान खेलो इंडिया क्रीडा निवड कार्यक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

संपूर्ण पश्चिम भारतातील युवा क्रीडा प्रतिभेला वाव देण्याच्या उद्देशाने भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) वतीने येथील एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग पुणे, येथे २२ ते २५ जून २०२४ या कालावधीत खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन (कीर्ती ) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम, विविध क्रीडा प्राकारांमध्ये भविष्यातील प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेवून त्यांचे पालनपोषण करण्याच्या दिशेने भारत सरकारचे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

'एमआयटी एडीटी' विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.सुराज भोयार, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त क्रीडा विभाग संचालक प्रा.पद्माकर फड यांचे व्यवस्थापन व मार्गदर्शनाखाली आयोजित होणाऱ्या या कार्यक्रमाद्वारे बॅडमिंटन आणि बॉक्सिंग (२२ जून), थलेटिक्स (२३ जून), फुटबॉल आणि खो-खो (२४ जून) तर कबड्डी आणि व्हॉलीबॉल (२५ जून) या क्रीडा प्रकारांसाठी खेळाडूंचे मूल्यमापन



करण्यात येणार आहे. प्रथम, सामान्य भौतिक मापदंडांचे मूल्यांकन करणे, त्यानंतर प्रत्येक खेळ प्रकारासाठी तयार केलेले क्रीडा-विशिष्ट मूल्यमापन करणे अशा दोन टप्प्यांमध्ये ही प्रक्रिया पार पडेल. या मुल्यांकनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना टॅलेंट असेसमेंट सेंटरकडून (टीएमसी) त्यांच्या कामगिरीचे तपशीलवार प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येईल. या चाचणीतून उत्तीर्ण झालेल्या प्रतिभांना खेळाडूंना उच्च स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रम जसे की खेलो इंडिया थलीट्स (कीया) मध्ये निवडले जाण्याची संधी प्राप्त होणार आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनाची संधी दिल्याबद्दल एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा कुलगुरू प्रा.डॉ. मंगेश कराड यांनी भारत सरकारचे आभार मानले. ते म्हणाले, एमआयटी एडीटी विद्यापीठ कायमच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते, ज्यात क्रीडा क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व आहे. एक चांगला खेळाडू तण, मन आणि चारित्र्याने संपन्न असतो, तोच भविष्यात राज्यासह देशाचे नाव उज्वल करतो. त्यामुळे या स्पर्धेच्या माध्यमातून भविष्यातील प्रतिभावान खेळाडूंना त्यांची प्रतिभा दाखविण्याचे व्यासपीठ मिळवून देवू शकल्याचा नक्कीच अभिमान आणि तितकाच आनंद आहे.

भारत सरकारच्या या चार दिवसीय निवड चाचणी कार्यक्रमात राज्यातील युवा व प्रतिभावान खेळाडूंनी आवर्जून भाग घ्यावा, व नोंदणीसाठी श्री. सुनील मोरे यांच्याशी ९७६३३९८१३६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# तळेगाव येथे रामदास आठवले यांचे जोरदार स्वागत



**तळेगाव । प्रतिनिधी**

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे मंगळवारी(दि.१८) नियोजित कार्यक्रमास नारयणगाव कडे जात असताना तळेगाव दाभाडे स्टेशन चौकात दु.१२.१५वा.सुमारास आगमन झाले. यावेळी नागरिकांच्या वतीने त्यांचे स्वागत करुन भव्य सत्कार करण्यात आला. त्यांचे सोबत पश्चिम महाराष्ट्र आरपीआय अध्यक्ष सुर्यकांत वाघमारे, मावळ आरपीआय अध्यक्ष नारायण भालेराव होते. दरम्यान, स्टेशन चौकात प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी तळेगाव दाभाडे आरपीआय अध्यक्ष संदीप शिंदे, सुनील पवार, कामगार नेते अनिल गायकवाड, तानाजी गडकर, सिध्दार्थ कदम, महेंद्र साळवे, दिलीप डोळस, आदी उपस्थित होते.

# चिखलीत भंगार व्यापाऱ्यांनी हजारो कोटीचा जीएसटी बुडवला-परिवर्तन वाहतूक विकास आघाडीचा आरोप

## रॅकेटमध्ये व्यापाऱ्यांबरोबर जीएसटी अधिकाऱ्यांचा देखील समावेश जीएसटी विभागाची कार्यपद्धती संशयास्पद

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

व्यापारी आणि जीएसटी विभागातील अधिकारी यांची भ्रष्ट युती झाली असून संगणमताने यांनी कोट्यावधी रुपयांच्या महसुलावर डल्ला मारला आहे. यामध्ये नुकसान झालेल्या ग्राहक व व्यापाऱ्यांना दिलासा देणे ऐवजी कोट्यावधीचा महसूल स्वतःच्या घशात घालण्याचा प्रयत्न करीत आहेत असा आरोप पिंपरी चिंचवड परिवर्तन विकास आघाडीचे शहर उपाध्यक्ष गोपाल कचवे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केला.

यावेळी पिंपरी चिंचवड परिवर्तन वाहतूक विकास आघाडीचे अमित मोहिते, झोपडपट्टी सेलचे शहर अध्यक्ष सागर जाधव, सामुहिक गुंडगिरी, दहशतवाद तंटा भ्रष्टाचार विरोधी संघटनेचे विशाल मिठे आदि उपस्थित होते.

चिखली, कुदळवाडी येथील काही भंगार व्यवसाय करणारे व्यापारी मागील काही वर्षापासून जीएसटी अकाउंट च्या कागदपत्रांमध्ये फेरफार करून, बनावट नावाने, त्रयस्थ व्यक्तींच्या नावे जीएसटी चे खाते उघडून हजारो कोटी रुपयाची कर चोरी करीत असल्याचे माहिती कायद्याद्वारे मागवलेल्या माहितीतून सिद्ध झाले आहे. कर चोरी करणारे मोठे रॅकेट सक्रीय असून त्यांच्या माध्यमातून देशाच्या तिजोरीवर डल्ला मारण्याचे काम राजेरोसपणे सुरू आहे. यातुन अनेक उद्योजकांची फसवणुक केली जात आहे. ही बाब पुण्यातील जीएसटी विभागाचे अतिरिक्त महासंचालक देवेंद्र नागवेकर यांच्या निदर्शनास आणून देखील त्यांनी याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले आहे असाही आरोप गोपाल कचवे यांनी केला.

पुण्यातील जीएसटी विभागातील काही अधिकारी या रॅकेट मध्ये सहभागी असल्याने या रॅकेटमध्ये सहभागी असल्यामुळे यात नुकसान झालेल्या व्यापाऱ्यांना न्याय मिळत नाही अशा पद्धतीने राज्यातील ज्या व्यापाऱ्यांचे नुकसान झाले असेल त्यांनी पिंपरी चिंचवड परिवर्तन वाहतूक विकास आघाडीशी संपर्क साधावा लवकरच याबाबत न्यायालयात दावा दाखल करण्यात येणार आहे. तसेच कर चुकवेगिरी करणाऱ्या संबंधित व्यापाऱ्यांवर अधिकाऱ्यांनी फौजदारी गुन्हा दाखल करावा अन्यथा २१ जुलै पासून पुण्यातील जीएसटी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा पिंपरी चिंचवड परिवर्तन वाहतूक विकास आघाडीच्या वतीने देण्यात आला आहे.

अशा पध्दतीने केली जाते फसवणूकः-

अनंकांच्या नावे बोगस कागदपत्रांच्या आधारे परस्पर अनेक बनावट कंपन्या चालु करुन बिल विक्री करणे, हवाला मार्फत पैसे देवाण घेवाण करणे, नव - नविन बँक खाते वापरणे, मनी ट्रान्सफर मार्फत हवाला आणणे या माध्यमातून जीएसटी ची चोरी केली जाते. यासाठी स्क्रॅप, प्लॅस्टिक, स्टिल, रिअल इस्टेट, मधील व्यावसायिकांना बनावट कंपनीची जीएसटीची बिले दिली जातात. अस्तित्वात नसलेल्या कंपन्याच्या बनावट देयकांच्या मदतीने खरेदी विक्रीचे खोटे व्यवहार कागदोपत्री उभे करुन त्याचे आपआपसात चक्रीय पध्दतीचे व्यवहार दाखवतात आणि त्या आधारे जीएसटी इनपुट क्रेडीट मिळवून वर्षाला हजारो कोटीची कर चोरी केली जाते. नंतर अधिकारी वर्गाच्या मदतीने उभ्या केलेल्या बनावट कंपन्या बंद करुन या प्रकरणातून सही सलामत सुटतात. रॅकेट मध्ये यांचा समावेशाचा कच्छवेंचा आरोप ?

अनेक वर्षापासून कुदळवाडी परिसरात एम. डी. कैश रहमानी नामक व्यक्तीकडून बनावट जीएसटी चोरीचे रॅकेट चालवले जात असल्याचा आरोप गोपल कच्छवे यांनी केला आहे.

रहमानी हा आशिया स्टील ट्रेडर्स या कंपनीचा मालक असून या कंपनीच्या शेकडो कोटी रुपयाच्या जीएसटी घोटाळ्यातील प्रमुख फरार आरोपी आहे. कैश रहिमान व त्याचे परप्रांतिय साथिदार गरीब लोक, मित्र, नातेवाईक यांना पैशाचे अमिश दाखवून त्यांच्या नावावर अनेक कंपन्या चालवतात. या कंपन्यामार्फत ही सर्व टॅक्स चोरी केली जाते. यामध्ये सबंधित विभागातील काही अधिकारी देखील सामिल असल्यामुळे यावर कोणत्याच प्रकारची कायदेशीर कारवाई होत नसल्यामुळे अनेक व्यापारी यांचे ग्राहक बनत असून सरकारचा कोट्यावधी रुपयाचा कर चुकविला जात आहे. या सर्व प्रकरणात रहमानी यांचे नातेवाईक मोहम्मद अहमद उर्फ आदिल रहमानी (कशफ ट्रेडींग कंपनी), आरिफ रहीमानी, राजेश सवाराम चौधरी, (आंबिका आर.एस एंटरप्रायसेस), अली रहिमानी, मनव्वर अजीज चौधरी यांचा समावेश असल्याचा आरोप केला आहे.

या रॅकेट मध्ये अनेक परप्रांतिय व उत्तर प्रदेशातील भंगार व्यावसायिकांचा आणि जीएसटी विभागातील काही अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय आहे. कुदळवाडी मधील अनेक व्यापाऱ्यांच्या आर्थिक व्यवहाराची कसुन चौकशी केल्यास अनेक प्रकरणे बाहेर येतील असेही पिंपरी चिंचवड परिवर्तन विकास आघाडीचे शहर उपाध्यक्ष गोपाल कचवे यांनी सांगितले.

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील अश्वांचे अंकलीहून प्रस्थान

**पुणे । प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात अग्रभागी असणाऱ्या देवाच्या व स्वाराच्या अश्वांचे प्रस्थान अंकली जि बेळगांव येथून मंगळवारी ( दि.१८ ) हरिनाम गजरात झाले. आळंदी मंदिरात परंपरांचे पालन करीत निर्जला एकादशी हरिनाम गजरात साजरी करण्यात आली. भाविकांनी श्रींचे दर्शन घेत मंदिर व नगरप्रदक्षिणा केली.



**अलंकापुरीत निर्जला एकादशी साजरी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या आळंदी ते पंढरपूर या पालखी सोहळ्यात मानाचे स्थान असलेल्या माऊलींच्या अश्वाचे निर्जला एकादशी दिवशी शितोळे - अंकली (ता. चिकोडी जि . बेळगांव ) येथून प्रस्थान झाले . हे अश्व अंकली ते आळंदी हा पायी प्रवास करुन दि. २८ जून रोजी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आळंदीत दाखल होतील . २९ जून रोजी आळंदी मंदिरातून श्रींचे वैभवी पालखी सोहळ्याचे आळंदी मंदिरातून प्रस्थान होणार आहे.

या प्रस्थान सोहळ्यास श्रीमंत उर्जितसिंह शितोळे सरकार , महादजीराजे शितोळे सरकार , युवराज विहानराजे शितोळे सरकार , पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, माऊली गुळुजकर, पालखी सोहळ्याचे मानकरी योगेश आरु, योगीराज कुऱ्हाडे, राहुल भोर, सरपंच सत्यवान बवले, आदीसह वारकरी उपस्थित होते.

सन १८३२ मध्ये श्री क्षेत्र आळंदी ते श्री क्षेत्र पंढरपूर अशी संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा सुरु झाला. अगदी तेंव्हा पासून श्रीमंत शितोळे सरकार यांचे अश्व व देवाला रात्री मुक्कामाचे ठिकाणी तंबू देण्याची परंपरा आहे. २९ जून रोजी आषाढी पायी वारी पालखी सोहळा आळंदीतून पंढरीकडे प्रस्थान करेल. अंकली येथील शितोळे सरकारांच्या राजवाड्यात अश्वांचे विधिवत पूजन, परंपरांचे पालन करीत धार्मिक पूजा विधी झाल्यानंतर श्रीमंत शितोळे सरकार यांचे नियंत्रणात पूजना नंतर नगर प्रदक्षिणा झाल्यावर या अश्वाचे आळंदीकडे प्रस्थान झाले हरिनाम गजरात झाले.

# टोमॅटोने खाल्ला 'भाव'; नारायणगाव उपबाजारात कॅरेट ९०० रुपयांना

**मंचर । प्रतिनिधी**

पुढारी वृत्तसेवा : बाजारात टोमॅटो चांगलाच 'भाव' खाऊ लागला आहे. जुन्नरच्या नारायणगाव उपबाजारात एका कॅरेटला ७०० रुपयांच्या वर उच्चांकी दर मिळू लागला आहे. त्यामुळे टोमॅटो उत्पादक शेतकर्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. तर इतर भाजीपाल्याची आवक कमी झाली असून दरात मोठी वाढ झाली आहे.

आंबेगाव तालुक्यातील मंचर, घोडेगाव, कळंब, नारोडी, पिंपळगाव, खडकी, निरगुडसर, भराडी, पारगाव, काठापूर भागात टोमॅटोच्या बागा बांधणीची कामे जोरात सुरू आहेत. उन्हाळी हंगामात टोमॅटोचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले गेले आहे. परंतु, सुरुवातीला बाजारभावाची साथ मिळाली नाही. अनेक शेतकर्यांनी बागा सोडून दिल्या. आता मात्र टोमॅटोच्या बाजारभावात मोठी वाढ झाली आहे. येथील टोमॅटोला उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे.

पाऊस आणि टोमॅटोची घटलेली आवक यामुळे नारायणगाव बाजार समितीत टोमॅटोला आता उच्चांकी बाजारभाव मिळत



आहे. मागील २ दिवसांपासून एक नंबर टोमॅटोच्या २० किलोच्या कॅरेटला तब्बल ८०० रुपयांपेक्षा जास्त दर मिळाला आहे. तर सरासरी हा भाव ६०० ते ९०० रुपये दर मिळत असल्याने शेतकरी आनंदी आहेत.

येत्या काही दिवसांत टोमॅटोचा दर हा प्रतिकॅरेट १ हजार रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता व्यापार्यांनी व्यक्त केली आहे. अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान झाल्याने गेल्या ३ दिवसांत टोमॅटोची आवक कमी झाली असून भाव वाढले आहेत, असे व्यापारी सचिन टेमकर यांनी सांगितले.

दीड एकरमध्ये टोमॅटोचे पीक घेतले आहे. अंदाजे एकरी ३ लाख रुपये खर्च आला आहे. सध्या बाजारात टोमॅटोला ८० ते ९० रुपये किलोला भाव मिळू लागला आहे. आत्तापर्यंत ४ ते ५ तोडे झाले असून लागवडीचा खर्च वसूल झाला आहे. आतापर्यंत टोमॅटोचे ७०० कॅरेट गेले असून अजून सरासरी २ हजार कॅरेट उत्पादन होऊ शकते, असे टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक गावडे, सुभाष गावडे यांनी सांगितले.